सत्यमेव जयते

# जैविक विविधता कायदा, 2002
# व
# जैविक विविधता नियम, 2004

NATIONAL BIODIVERSITY AUTHORITY

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण

भारत

प्रकाशन हक्क : राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण, 2004.

या प्रकाशनामध्ये भारत सरकारने लागू केलेले जैविक विविधता कायदा, 2002 आणि जैविक विविधता नियम, 2004 समाविष्ट आहेत. त्यामुळे हे शैक्षणिक आणि विना नफा कार्यासाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण पूर्व (विशेष) परवानगी न घेता पुर्नमुद्रित करता येईल. कुठल्याही प्रकाशनामध्ये या पुस्तकाचा संदर्भ म्हणून वापर केला असेल तर त्याची प्रत मिळाली तर प्राधिकरणास विशेष आनंद होईल.

संदर्भसूची मध्ये व संदर्भासाठी या पुस्तकाचा ऊल्लेख जैविक विविधता कायदा, 2002 आणि जैविक विविधता नियम, 2004, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण, (2004), 57 पृष्ठे असा करावा.

भाषंतर:
डॉ. लीला जे भोसले
एच.ओ.डी. बॉटनी डीपार्टमेंट (रिटयर्ड)
शिवजी युनिव्हर्सिटी
कोल्हपूर - 416003

*अधिक माहितीसाठी संपर्क :*
अध्यक्ष
राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरर्ण,
475, 9 वा साऊथ क्रॉस स्ट्रीट,
कपालीश्वरर नगर,
निलांकराई,
चेन्नई 600 041.

*मुद्रक*
फ्रंट लाईन ऑफसेट प्रिंटर
26, न्यू स्ट्रीट, लॉइडस रोड.
तिरूवल्लिकेनि, चेन्नई - 600 005.

ஆ. இராசா
ए. राजा
A. RAJA



मंत्री
पर्यावरण एवं वन
भारत सरकार
पर्यावरण भवन, सी. जी. ओ. काम्पलैक्स
नई दिल्ली-110003
MINISTER
ENVIRONMENT & FORESTS
GOVERNMENT OF INDIA
PARYAVARAN BHAWAN, C.G.O. COMPLEX
NEW DELHI-110003

# FOREWORD

The increasing concerns about dwindling biological resources led to the Convention on Biological Diversity in 1992. This convention, for the first time recognized sovereign rights of States over their biological resources and emphasized that access to genetic resources should be only for environmentally sound purposes and should be subject to national legislations. The access has to be on mutually agreed terms which inter-alia would include recognition of associated Traditional Knowledge of indigenous communities and equitable benefit sharing arrangements.

Taking cognizance of the provisions of the CBD, and to deal with extensive pressure on our biological resources because of recent biotechnological developments, India has enacted an umbrella legislation called the Biological Diversity Act, 2002 (No. 18 of 2003), and also notified the Biological Diversity Rules, 2004. The Act and the Rules are for guidance of and complacence by various stake-holders, including the Union and the State Governments, Non-state sectors, and Individuals. I am sure that this handbook encompassing the Biological Diversity Act and the Rules being published by the National Biodiversity Authority will prove convenient and helpful to the implementers of this Act, and also to those seeking access to biological resources.

I would also like to take this opportunity to allay the fear that this Act may come into the way of biotechnology advancement or sustainable economic development activities. The Act has been formulated so as to take the guiding principles of the Convention on Biological Diversity (CBD) further. The Act aims at conservation of biological resources as well as facilitating access to them in a sustainable manner and through a just process. I must emphasize that India being a mega biodiversity country, should and would like to derive its strength from its rich genetic diversity, and to achieve this we need to have appropriate policies, programmes, and regulations.

The publication of this book will go a long way in achieving these objectives. I wish all the people involved in the conservation of biodiversity good luck in their efforts to make this world a better place to live.

**22nd September, 2004**
**New Delhi.**

**(A. RAJA)**

பேராசிரியர் முனைவர் ச. கண்ணையன்
**Prof. Dr. S. KANNAIYAN**
M.Sc., (Ag.) Ph.D., C. Biol., M.Biol., (London)
FIBA (Cambridge), FABI (USA), FNAAS, FISB, FAMI
**CHAIRMAN**



**NATIONAL BIODIVERSITY AUTHORITY**
475, 9th South Cross Street, Kapaleeswarar Nagar,
Neelankarai, Chennai - 600 041. Tamilnadu.
Tel : 044-24490805 Fax : 044-24491390
e-mail : nba_india1@vsnl.net
Website : www.nbaindia.org

# FOREWORD

Bioresources are important components for progress and economic activities of a nation. But bioresources management and utilization for human welfare is very important for the optimum utilization of the bioresources. Awareness of the importance and implications of bioresources among common people as well as elite educated citizens for safeguarding and protecting the optimum and balance way of using the bioresources needs critical studies to focus the natural bioresources wealth for the benefit of not only the present generation of our people but also to our future generations for their better, healthy and peaceful living on the earth. The problems facing at present is the over exploitation of bioresources which would not only have negative impact on the environment but also sometimes totally destroy and erode the important bioresources which are available at local level, regional level and national levels. Biological resources includes genetic resources, organisms or parts thereof, populations, or any other biotic component of ecosystems with actual or potential use or value for humanity. Therefore, handling Bioresources in a proper manner in an appropriate way is important for the optimum use without over exploitation of our bioresources wealth.

Biodiversity is being lost as on today more rapidly than at any time in the past several million years. Some Biologist believe that about 60,000 of the world's 2,40,000 plant species perhaps even higher proportions of vertebrate and insect species could become extinct within the next thirty years if the same trends continue. But even a species at no risk of extinction can lose much of it potential through the loss of genetic material by reduction in range, numbers and varieties. The current losses to biodiversity can be attributed to direct causes including habitat loss and fragmentation, invasion of introduced species, over exploitation of living resources and modern agriculture and forestry practices. The basic problems of losses to biodiversity includes :

- The unsustainably high rate of human population growth and natural resources consumption.
- The Steadily narrowing selection of traded products from agriculture, forestry and fisheries.
- Economic systems that fail to value economic resources.
- Inequity in ownership, management and flow of benefits from both the use and conservation of Biodiversity.

- Deficiencies in knowledge and application
- Legal and institutional systems that promote unsustainable exploitation.

Loss of species and genetic diversity presents a serious threat to the goal of sustainable agriculture. Species and genetic diversity provide sources of pest resistance and control, new domesticates and the genetic raw material for plant breeding and genetic engineering.

After an extensive and intensive consultation process involving the stakeholders, Central Government has brough Biological Diversity Act, 2002, with the following features.:

- To regulate access to biological resources of the country with the purpose of securing equitable share in benefits arising out of the use of biological resource and associated traditional knowledge relating to biological resources.
- To conserve and sustainable use of Biodiversity and Biological resources.
- To respect and protect traditional knowledge of local communities relating Biodiversity.
- To secure sharing of benefits with local people as conservers of bioresources and holder of knowledge and information relating to the use of bioresources.
- Conservation and development of areas of importance from the status of biological diversity by declaring them as biological diversity heritage site protection and rehabilitation of threatened species.
- Involvement of Institutions and State Governments in the broad scheme of the implementation of the Biological Diversity Act through constitution of State Biodiversity Boards (SBB) and Biodiversity Management Committees (BMC).

It is very important to protect and conserve the Biodiversity for the welfare of the humanbeings and awareness on the importance of Biodiversity and its economic values as well as threats to biodiversity among the common people, elite citizens, teachers, scientists, administrators, scholars, students and school children needs to be created to save our National wealth of Biodiversity.

**Date : 25.12.2005**

**Place : Chennai**

**Prof S. KANNAIYAN**

# भूमिका

जैविक विविधतेमध्ये पृथ्वीवरील सर्व सजीवांची विविधता समाविष्ट आहे. जगातील 12 बृहत विविधता देशांमधील भारत हा एक आहे. जगाच्या अवघे 2.5 % क्षेत्रफळ असलेल्या भारतात जागतीक प्रजातींपैकी 7.8 % प्रजातींची नोंद झालेली आहे. अनौपचारिक तसेच सिद्ध ,दोन्ही प्रकारच्या पारंपारीक व स्वदेशी ज्ञानाच्या बाबतीतही भारत समृध्द आहे.

भारत 1992 च्या जैविक विविधता संमेलनाचा वादी आहे. राष्ट्रांचे त्यांच्या जैविक संसाधनाबद्दलचे सार्वभौम अधिकार मान्य केल्यामुळे संमेलनाची अपेक्षा आहे की वादींनी राष्ट्रीय कायदा आणि परस्पर सामंजस्याच्या अटींच्या (कलम 3 व 5,CBD) अधीन राहून जनुकी संसाधन प्राप्तीला गती दिली पाहिजे.जैविक विविधता संमेलन कलम 8(j) मध्ये स्थानिक व एतद्देशीय समाजाचे पारंपारिक ज्ञान, पद्धती व नवपरिवर्तन यांच्या माध्यमातून जैविक संसाधनाचे संरक्षण व पोषक उपयोगितेमधील योगदान मान्य केले आहे व त्यासाठी अशा लोकांबरोबर त्यांचे ज्ञान, पध्दती आणि नवपरिवर्तन यापासून मिळणा-या फायद्याच्या समभाग भागीदारीची तरतुद आहे.

जैविक विविधता हा बहुशाखीय विषय असून त्यामध्ये विविध कार्यक्रम आणि कृति अंतर्भूत आहेत. जैविक विविधतेच्या सबंधातील हिस्सेदार आहेत केंद्र सरकार, राज्य सरकारे, स्थानिक स्वयंशासित मंडळांच्या संस्था, उद्योगधंदे इत्यादि. जैविक विविधता संमेलनात जपणूक केलेल्या फायद्याच्या समभाग मिळकतीच्या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी योग्य साधनाचा वापर करणे हे एक भारतापुढील आव्हान आहे.

हिस्सेदारांशी व्यापक व सखोल सल्लामसलत केल्यानंतर केंद्र सरकारने जैविक विविधता कायदा 2002 अस्तित्वात आणला. त्याची ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणेः

i.जैविक संसाधनाच्या तसेच जैविक संसाधनाशी निगडीत ज्ञानाच्या वापरातून होणा-या फायद्याच्या समभाग प्राप्तीची निश्चिती व्हावी या उद्देशाने देशातील जैविक संसाधनासाठीची पोहोच नियमित करणे; ii.जैविक विविधता टिकविणे आणि त्याचा पोषक उपयोग करणे; iii.स्थानिक समाजाच्या जैविक विविधतेच्या ज्ञानाचा मान राखणे व रक्षण करणे; iv.जैविक विविधता संरक्षक व जैविक संसाधनाच्या वापराबद्दलचे ज्ञान व माहितीधारक स्थानिक लोकांना लाभाच्या हिश्श्याची निश्चिती करणे; v.जैविक विविधतेच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या ठिकाणांना जैविक विविधता वारसा स्थान म्हणून जाहीर करुन त्यांचे संरक्षण व विकास करणे; vi.धोक्यात असलेल्या जातींचे रक्षण व पुनर्वसन करणे; vii.जैविक विविधता कायद्याच्या अंमलबजावणीच्या स्थूल आराखड्यामध्ये राज्य सरकारांच्या संस्थांचा समिती गठनाच्या माध्यमातून सहभाग ठेवणे.

भारत का राजपत्र
The Gazette of India
असाधारण / Extraordinary
भाग II - खंड - 1 / Part II - Section- I
PUBLISHED BY AUTHORITY
NEW DELHI, WEDNESDAY, FEBRUARY 5, 2003 / MAGHA 16, 1924
Separate paging is given to this part that it may be filed as a separate compilation

विधी व न्याय मंत्रालय

(कायदा विभाग)

*नवी दिल्ली, 5 फेब्रुवारी 2003 / माघ 16, शके 1924*

संसदेच्या खालील कायद्यास राष्ट्रपतींची 5 फेब्रुवारी 2003 रोजी संमति प्राप्त झाली असून सर्वसामान्य माहितीसाठी हा येथे प्रकाशित करण्यात येत आहे :-

# जैविक विविधता कायदा, 2002

## 2003 चा क्र. 18

जैविक विविधतेचे संरक्षण, त्यातील घटकांचा पोषक उपयोग आणि जैविक संसाधन व ज्ञान यापासून निर्माण होणा-या फ़ायद्याचे योग्य व समान प्राप्तीसाठी तसेच त्यासंबंधी व अनुषंगिक बाबींसाठी सदरचा कायदा करणेत येत आहे.

ज्याअर्थी भारत हा जैविक विविधता आणि त्यासंबंधीच्या पारंपारिक व तत्कालिन ज्ञान प्रणालीचे बाबतीत संपन्न आहे;

आणि ज्याअर्थी रिओ दि जनेरो येथे 5 जून 1992 रोजी जैविक विविधते बदलच्या संयुक्त राष्ट्रसंघ करारावर स्वाक्षरी झालेला भारत एक घटक पक्ष आहे ;

आणि ज्याअर्थी सदरचा करार 29 डिसेंबर 1993 पासून अंमलात आला आहे ;

आणि ज्याअर्थी सदर करार जैविक संसाधनाबाबतचे राष्ट्रांचे सार्वभौम अधिकार पुनर्निश्चित करतो;

आणि ज्याअर्थी वरील कराराचा प्रमुख उद्देश आहे जैविक विविधतेचेसंरक्षण, त्याच्या घटकांचे पोषक उपयोग आणि जनुकी संसाधनाच्या वापरातून होणारे फ़ायदे योग्य व समभाग पध्दतीने प्राप्त होणे;

आणि ज्याअर्थी संरक्षण,पोषक उपयोग आणि जनुकी संसाधनाच्या वापरातून निर्माण होणा-या फ़ायद्याची समभाग प्राप्ती तसेच सदर कराराची अंमलबजावणी करणे आवश्यक मानले आहे .

भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षीच्या संसदेत हा कायदा खालील प्रमाणे अधिनियमित इ ालाः-

## प्रकरण - 1

## प्राथमिक

लघु शीर्षक, मर्यादा व

1. (1) या कायद्याला जैविक विविधता कायदा 2002 असे म्हणता येईल.

(2) हा सर्व भारतभर लागू आहे.

(3) केन्द्र सरकारने राजपत्राद्वारे जाहीर केलेल्या तारखेस सदरचा कायदा अंमलात येईल,

मुद्दा :

तथापि या कायद्यातील वेगवेगळ्या तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी वेगवेगळ्या तारखा निश्चित करता येतील आणि या कायद्याची अंमलबजावणीची तारीख ही त्या तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ समजला जाईल

व्याख्या

2. या कायद्यात, जोपर्यंत संदर्भाने अन्य अर्थ ध्वनीत होत नाहीत, -

(अ) च्कायद्याचा हक्कदारछ म्हणजे जैविक संसाधनाचा,त्याच्या जोड उत्पादनांचा सरंक्षण कर्ता, अशा जैविक संसाधनाच्या उपयोगाबाबतचे ज्ञान व माहिती नाविन्य आणि उपयोग व वापराच्या पध्दती यांचा जनक व धारक;

(ब) च्जैविक विविधताछ म्हणजे सर्व प्रकारच्या संजीवांमधील अनित्यता व ते ज्याचे

घटक आहेत ती जटील परिस्थितीकी आणि,यामध्येजातींची अथवा जातीमधील व परिसंस्थेची

विविधता अंतर्भूत आहे ;

(क)छजैविक संसाधनछ म्हणजे वनस्पती, प्राणी, सूक्ष्म जीवमात्र वा त्यांचे भाग,त्यांचे

जनुकी साधन व जोड उत्पादने (मूल्यवर्धित उत्पादने सोडून ) प्रत्यक्ष किंवा संभाव्य उपयोग किंवा मूल्यासहित, परंतु मानवी जनूकी साधनांचा समावेश नाही ;

(ड)छजैव सर्वेक्षण आणि जैव उपयोगिताछ म्हणजे जैविक संसाधनातील जाती, उपजाती, जनुके, घटक व आर्क यांचे कुठल्याही कारणासाठी सर्वेक्षण करणे अथवा गोळा करणे आणि यामध्ये गुणधर्म निश्चित करणे, अविष्करण आणि जैवपरीक्षा यांचा समावेश होतो;

(इ)छअध्यक्षछ म्हणजे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा किंवा यथास्थिती राज्य जैवीक मंडळाचा अध्यक्ष होय ;

(फ)छवाणिज्य उपयोगिताछ म्हणजे जैविक संसाधनाचा वाणिज्यकारकतेसाठीचा अंतिम उपयोग, जसे औषधे, औद्योगिक विकरे, खाद्य-सुंगध, सुवास, सौंदर्य प्रसाधने, पायसिका, ऑलीओ रेझीन, रंग, अर्क व जनुकी माध्यमातून सुधारीत पीक व पशूधनासाठी वापरण्यात आलेली जनुके, परंतु यामध्ये शेती,फलोत्पादन,कुक्कुटपालन,दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन अथवा मधमाशापालन यासाठीच्या रुढ संकर पध्दती किंवा पारंपारिक पध्दतींचा समावेश होत नाही.



(ग) च्योग्य आणि न्याय्य लाभ भाग मिळणेछ म्हणजे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाद्वारे कलम 21 प्रमाणे निश्चित केलेले लाभ मिळणे;

(घ) च स्थानिक संस्था च म्हणजे घटना कलम 243B पोट कलम (1) व कलम 243 Q पोट कलम (1) अभिप्रेत असलेली पंचायत अथवा नगरपालिका, नाव कोणतेही असो, मात्र जेथे पंचायत अथवा नगरपालिका नसतील तेथे संविधानाचे कोणत्याही तरतुदी नुसार अथवा केंद्राचे कायद्याप्रमाणे वा राज्याचे कायद्याप्रमाणे निर्माण झालेल्या स्वयंशासित संस्था;

(च) च्सदस्यछ म्हणजे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा अथवा जैविक विविधता प्राधिकरण मंडळाचा सदस्य, यात अध्यक्षाचाही समावेश होतो ;

(छ) च्राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणछ म्हणजे कलम 8 खाली प्रस्थापित केलेले राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण

(ज) च्नेमून दिलेलेछ म्हणजे या कायद्याखालील नेमून दिलेले;

(झ) च्ठरावछ म्हणाजे या कायद्याखाली केलेले ठराव;

(ट) च्संशोधनछ म्हणजे कोणत्याही उपयोगासाठी उत्पादन करणे किंवा उत्पादने वा पध्दतीत बदल घडवून आणणेसाठी जैविक संस्थांचा, जीवमात्रांचा अथवा त्यातून निर्माण होणा-या घटकांचा उपयोग करुन जैविक संसाधनाचा अथवा तांत्रिक वापरांचा अभ्यास करणे वा पध्दतशीर शोध घेणे होय;

(ठ) च्राज्य जैविक विविधता मंडळछ म्हणजे कलम 22 खाली प्रस्थापित केलेले राज्य जैविक विविधता मंडळ होय;

(ड) च्पोषक उपयोगछ म्हणजे जैविक विविधतेतील घटकांचा अशा प्रकारे व अशा गतीने उपयोग करणे की जेणेकरुन जैविक विविधतेचा दीर्घकालीन -हास होणार नाही व त्यातून वर्तमान आणि भावी पिढ्यांची गरज व अपेक्षा पु-या करणेची शक्यता टिकून राहील;

(ण) च्मूल्यवर्धित उत्पादनेछ म्हणजे अशी उत्पादने की ज्यामध्ये वनस्पती व प्राणी यांचे ओळखू न येणा-या आणि प्रत्यक्ष पृथक न होणा-या स्वरुपातील भाग वा अर्क असू शकतील.

## प्रकरण - 2

## जैविक विविधतेपर्यंतची पोहोच व तिचे नियमन

3.(1) पोट कलम 2 मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही व्यक्तीस राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे पूर्व परवानगी शिवाय भारतातील कोणतेही जैविक संसाधन च त्याबद्दलचे कोणतेही ज्ञान संशोधनासाठी अथवा वाणीज्य उपयोगितेसाठी अथवा जैविक सर्वेक्षणाकरिता अथवा जैविक उपयोगाकरिता मिळविता येणार नाही.

काही व्यक्तींना जैविकविविधता प्राधिकरणाच्या संमतिशिवाय जैविक विविधतेच्या संबंधी कार्यक्रम हाती घेता येणार नाहीत

(2) च्या व्यकींना पोटकलम (1) खाली राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची परवानगी घेणे गरजेचे आहे त्या व्यक्ती खालीलप्रमाणे :-

(अ) जी व्यक्ती भारताची नागरीक नाही ;

1961 चे 43

(ब) जी भारतीय नागरीक आहे परंतु, आयकार कायदा 1961 कलम 2 पोटकलम 30 खाली अनिवासी ठरविली गेली आहे ;

(क) संयुक्त संस्था, संघटना किंवा मंडळ -

(i) जी भारतात समाविष्ट नाही अगर नोंदलेली नाही ; किंवा

(ii) भारतात अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली समाविष्ट आहे वा नोंदलेली आहे परंतु ज्यात अभारतीय सह-हिस्सेदाराचे भाग भांडवल अथवा व्यवस्थापन आहे.

संशोधनाचे निष्कर्ष राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय काही व्यक्तींनी हस्तांतरित करणेचे नाहीत

1961 चे 43

4. कोणाही व्यक्तीस भारतात किंवा भारतीय जैविक संसाधनावरील संशोधनातून मिळालेले निष्कर्ष राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे पूर्व परवानगीशिवाय रक्कम वा अन्य स्वरुपात अशा कोणाही व्यक्तीला हस्तांतरीत करता येणार नाहीत की जी भारतीय नागरीक नाही, भारतीय नागरीक असून आयकार कायदा 1961 कलम 2 पोटकलम 30 खाली अनिवासी ठरविली गेली आहे किंवा जी संयुक्त संस्था, संघटना भारतात समाविष्ट नाही अथवा भारतात नोंदलेली नाही, अथवा ज्या संयुक्त संस्थेत वा संघटनेत अभारतीयाचे भाग भांडवल वा व्यवस्थापन आहे.

खुलासा - या कलमात नमूद केलेल्या ष्हस्तांतरछ या शब्दात एखाद्या चर्चासत्रात वा कार्यशाळेत प्रसिद्ध व प्रकाशित केलेल्या शोध निबंधाचा वा ज्ञानाच्या प्रचाराचा समावेश होत नाही, जर हे प्रकाशन केंद्र सरकारच्या मार्गदर्शक नियमाप्रमाणे असेल.

काही संयुक्त संशोधन प्रकल्पाना कलम 3 व 4 लागू पडत नाही

5. (1) संस्थांमधून, ज्यात भारत सरकार अनुदानित संस्था व इतर देशातील अशा संस्था यांच्यामधे जैविक संसाधनाबाबत व तत्संबंधीची माहिती बाबत हस्तांतरण व देवाण-घेवाण अंतर्भूत असलेले संयुक्त संशोधन प्रकल्प यांना कलम 3 आणि 4 मधील तरतूदी लागू पडत नाहीत मात्र अशा संयुक्त संशोधन प्रकल्पाने पोटकलम (3) मधील अटींची पूर्तता केली असली पाहीजे.

(2) पोट कलम (1) मध्ये नमूद केलेल्या संशोधन प्रकल्पाशिवाय, जे संशोधन प्रकल्प प्रस्तुत कायदा अंमलात येणेपूर्वीच्या करारावर आधारीत आहेत, आणि ज्यांचे काम चालू आहे, अशा प्रकल्पांचे करारातील जेवढ्या तरतूदी कायद्याशी वा पोटकलम (3) उपकलम (अ) मधील मार्गदर्शक तत्वांशी विसंगत असतील त्या रद्दबातल समजल्या जातील.

(3) पोटकलम (1) मध्ये नमूद केलेला संयुक्त संशोधन प्रकल्प म्हणजे -



(अ) केंद्र सरकारने दिलेल्या मार्गदर्शक धोरणाशी जे सुसंगत आहेत;

(ब) जे केंद्र सरकारने मान्य केलेले आहेत.

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय बौध्दिक मालमत्ता स्वामित्वासाठी अर्ज करता येणार नाही

6. (1) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे पूर्व परवानगी शिवाय कोणाही व्यक्तीस भारतातून मिळविलेल्या जैविक संसाधनाबद्दलच्या माहिती अथवा शोधावर आधारीत बौध्दिक मालमत्ता हक्क, तो भारतात व भारताबाहेर कोणत्याही नावाने संबोधित असला तरी, मिळण्यासाठी कोणाही व्यक्तीस अर्ज करता येणार नाही.

जर एखाद्या व्यक्तीने सनद मिळणेसाठी अर्ज केला असेल तर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची परवानगी सनद मंजूर झाल्यावर घेता येईल, मात्र ही परवानगी संबंधित सनद अधिका-यांनी सनद मोहोरबंद करणेपूर्वी असली पाहिजे:

आणि जर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने त्यांचेकडे परवानगी मिळणेसाठी आलेला अर्ज, मिळाल्या तारखेपासून नव्वद दिवसाचे आत निर्णीत केलेला असला पाहिजे.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण या कलमाखाली मान्यता देताना फायद्यातील हिस्सा फी अथवा मानधन अथवा दोन्ही बाबत किंवा वाणिज्य उपयोगातून होणा-या आर्थिक फायद्याबाबत हिश्श्याबाबत अटी घालू शकते.

(3) वनस्पतींच्या प्रकाराच्या रक्षणाच्या दृष्टीने केंद्र सरकारने केलेल्या कोणात्याही कायद्याखाली एखादा हक्क मिळणेसाठी अर्ज करणा-या व्यक्तीस या कलमातील तरतूदी लागू होत नाहीत.

(4) पोटकलम (3) मधील नमूद केलेला हक्क एखाद्या व्यक्तीस प्रदान करीत असताना, संबंधित अधिका-याने सदरचा हक्क प्रदान करण्याच्या दस्ताऐवजाची शेरा केलेली प्रत राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाकडे पाठविली पाहिजे.

काही हेतूसाठी जैविक संसाधन मिळविणेस राज्य जैविक विविधता मंडळाला पूर्व सूचना देणे

7. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणास पूर्व सूचना न देता कोणाही व्यक्तीस जी भारतीय नागरिक आहे, जी संयुक्त संस्था, मंडळ अथवा संघटना भारतात नोंदलेली आहे तिला जैविक

संसाधनाच्या वाणिज्य उपयोगासाठी किंवा जैविक सर्वेक्षणासाठी अथवा जैविक उपयोगातून वाणिज्य वापरासाठी घेता येणार नाही :

अर्थात या कलमातील तरतूदी, स्थानिक लोक, त्या भागातील जाती, जैविक विविधतेचे उत्पादक व जैविक विविधतेची पैदास करणारे व वैद्य तसेच हकीम की जे औषधांचा व्यवसाय करतात, त्यांना लागू होत नाहीत.

प्रकरण - 3

## राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची स्थापन**

**8.** (1) केंद्र सरकारने राजपत्रात जाहीर केलेल्या तारखेपासून, केंद्र सरकारने, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण या नावाने ओळखली जाणारी संस्था या कायद्यासाठी प्रस्थापित करणेची आहे.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण या वरील नावाने ओळखली जाणारी संस्था ही कायम स्वरुपी परंपरेने चालणेची असून तिची स्वतंत्र मोहोर असणेची आहे तसेच तिला करार करणेचा,स्थावर व जंगम मालमत्ता मिळविणेचा, सांभाळणेचा आणि तबदिल करणेचा अधिकार असून याच नावाने तिने इतरांविरुद्ध व इतरांनी तिचे विरुद्ध दावा करणेचा आहे.

(3) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे मुख्य कार्यालय चेन्नई येथे राहणेचे असून केंद्र सरकारच्या पूर्व मान्यतेने राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण भारतात इतरत्र कार्यालये काढू शकते.

(4) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणात खालील सदस्यांचा समावेश असेल :-

(अ) अध्यक्ष - जी व्यक्ती सुप्रसिद्ध आहे व जिला जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत व पोषक उपयोगाबद्दल आणि नफ्यातील हिश्श्याचे योग्य वाटपाबाबत पुरेसे ज्ञान आहे व माहिती आहे अशा व्यक्तीची केंद्र सरकारने अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणेची आहे.

(ब) केंद्र सरकारने तीन पदसिद्ध सदस्यांची नियुक्ती करणेची आहे. एक जनजाती कार्याच्या संबंधित मंत्रालयाचे प्रतिनिधीत्व करणारा, पर्यावरण व वनसंबंधित मंत्रालयाचे प्रतिनिधीत्व करणारे दोन सदस्य ज्यात एक अप्पर वन-महानिदेशक अथवा वन-महानिदेशक असेल.

(क) खाली नमूद केलेल्या केंद्र सरकारच्या मंत्रालयाचे प्रतिनिधीत्व करणेसाठी सात पदसिद्ध व्यक्तींची नियुक्ती करणेची आहे.

(i) कृषि संशोधन व शिक्षण

(ii) जैव प्रौद्योगिकी

(iii) समुद्र विकास

(iv) कृषि आणि सहकार

(v) औषध व होमिओपॅथीची भारतीय पद्धती

(vi) विज्ञान आणि तंत्रज्ञान

(vii) वैघातिक आणि औद्योगिक शोध



(ड) विषय तज्ञ व शास्त्रज्ञ ज्यांना जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत, जैविक संसाधनाच्या पोषक उपयोगितेबाबत, जैविक संसाधनाच्या उपयोगातून मिळणा-या नफ्याच्या वाटपाबाबत विशेष ज्ञान आहे व अनुभव आहे, जैविक संसाधनाचे संरक्षक, निर्माते व ज्ञानधारक, औद्योगिक प्रतिनिधी यातून पाच अकार्यालयीन सदस्यांची नेमणूक करणेची आहे.

**अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या अटी**

**9.**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या व पदसिध्द सदस्य सोडून अन्य सदस्यांच्या पदकाल व सेवेबाबतच्या अटी केंद्र सरकारने निश्चित करणेच्या आहेत.

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा अध्यक्ष प्रमुख कार्यकारी अधिकारी**

**10.**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा अध्यक्ष हा त्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी असून, नेमून दिल्याप्रमाणे अधिकाराचा वापर व कार्य करणेचे आहे.

**सदस्यांना काढून टाकणे**

**11.**केंद्र सरकारचे मते जी व्यक्ति खाली नमूद केलेप्रमाणे आहे अशा सदस्यास राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणातून काढून टाकू शकते-

(अ) जी व्यक्ति दिवाळखोर म्हणून ठरविली आहे; किंवा

(ब) ज्या व्यक्तीस नैतिक अधःपाताच्या गुन्ह्याबाबत शिक्षा झाली आहे;

(क) सदस्य म्हणून काम करणेस शारीरिक व मानसिक दृष्ट्या असमर्थ झाली आहे;

(ड) जिने अधिकाराचा इतका गैरवापर केला आहे की, तिचा सदस्य म्हणून कार्यालयीन सहभाग चालू ठेवणे सार्वजनिक हिताचे विरुध्द होणार आहे;

(इ) सदस्य म्हणून कार्य करणे अन्यायकारक ठरावे अशा प्रकारचे आर्थिक वा अन्य लाभ जिने मिळविले आहेत.

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या सभा**

12. (1) निश्चित केल्याप्रमाणे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने ठराविक ठिकाणी, ठराविक वेळेस एकत्र येणेचे असून सभेमध्ये कामकाजाच्या पध्दतीबाबत ठरविल्याप्रमाणे नियम पाळणेचे आहेत (त्यात सभेसाठी किमान सदस्य संख्येचा समावेश आहे).

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या सभेमध्ये राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या अध्यक्षाने सभेचा अध्यक्ष म्हणून काम करणेचे आहे.

(3) जर कोणत्याही कारणामुळे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा अध्यक्ष सभेस हजर राहू शकत नसेल तर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या सदस्यांनी निवडलेला सभेला

हजर असलेला कोणताही सदस्य सभेचा अध्यक्ष होऊ शकतो.

(4) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे सभेपुढे येणा-या प्रश्नांचा निर्णय, सभेस हजर असलेल्या सभासदांच्या मताधिक्याने घेतला जाईल व जेव्हां सभेतील मतांची संख्या सारखी होईल तेव्हां अध्यक्षाने व अध्यक्षांचे अनुपस्थित जो सदस्य अध्यक्ष असेल त्याने आपले दुसरे किंवा निर्णायक मत देणेचे आहे.

(5) ज्या सभसदाचा, सभेत निर्णित होणा-या विषयासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष किंवा व्यक्तिशा संबंध अथवा हितसंबंध असेल त्याने त्याच्या संबंधाचे वा हितसंबंधाचे स्वरूप प्रकट केले पाहिजे व अशा प्रकटीकरणानंतर संबंध वा हितसंबंध असालेल्या सदस्याने त्या सभेस हजर राहणेचे नाही.

(6) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची कोणतीही कृति वा कार्यवाही केवळ खालील कारणानुळे अवैध ठरविता येणार नाहीः-

(अ) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या घटनेत असलेल्या रिक्त स्थान किंवा दोषामुळे, अथवा,

(ब) सदस्य म्हणून नेमणूक केलेल्याच्या नेमणूकीमधील दोषामुळे,अथवा

(क) विचाराधिन बाबीच्या गुणवत्तेवर ज्याचा कोणताही परिणाम होत नाही अशा राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या पध्दतीतील अनियमिततेमुळे.

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या समित्या**

13. (1) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण कृषि-जैविक विविधतेबद्दल कार्य करणेसाठी समिती तयार करु शकते.

खुलासा - या पोटकलमातील च्कृषि-जैविक विविधताछ म्हणजे कृषिविषयक जाती व त्यांचे वन्य जाती यांची जैविक विविधता.

(2) यातील पोटकलम (1) च्या कोणत्याही तरतुदींना बाध न आणता राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण या कायद्यातील त्यांच्या कर्तव्याचे सक्षमतेने पालन होणेसाठी व कार्य करणेसाठी, त्यांना योग्य वाटतील तितक्या सदस्यांच्या समित्या नेमू शकते.

(3) या कलमाप्रमाणे तयार करणेत आलेली समिती, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे जे सदस्य नाहीत अशा, त्यांना योग्य वाटेल तितक्या व्यक्ति सहभागी करुन घेऊ शकते; अशा व्यक्तींना सभेस हजर राहणेचा, सभेच्या कामकाजात भाग घेणेचा हक्क असला तरी त्यांना मत देणेचा हक्क असणार नाही.



(4) पोटकलम (2) नुसार ज्या व्यक्तींची सदस्य म्हणून नेमणूक केली आहे अशा व्यक्तीस केंद्र सरकारने ठरवून दिले प्रमाणे समितीच्या सभेस हजर राहणेबद्दलचा भत्ता वा फी मिळणेचा हक्क आहे.

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी**

14.(1) या कायद्याखालील कार्याच्या सक्षम पूर्ततेसाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण त्यांना गरज वाटेल तितक्या अधिका-यांची व इतर कर्मच्या-यांची नियुक्ती करु शकते.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या अधिका-यांच्या व इतर कर्मच्या-यांच्या सेवेच्या शर्ती व अटी या ठरावाने निश्चित केल्याप्रमाणे असतील.

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे हुकुम व निर्णयाचे प्रमाणिकरण**

15. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे सर्व हुकुम व निर्णय अध्यक्षाच्या किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने अधिकृत केलेल्या सदस्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित होणेचे आहेत आणि राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने कार्यान्वीत केलेले इतर सर्व दस्तऐवज यासाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने अधिकृत केलेल्या अधिका-याच्या स्वाक्षरीने प्रमाणित करणेचे आहेत.

**अधिकार देणे**

16. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे सामान्य या विशेष लेखी हुकूमाने राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या कोणाही सदस्यास वा अधिका-यास अथवा हुकूमात नमूद केलेल्या शर्तींस पात्र राहून कोणाही व्यक्तीस या कायद्याखलील अधिकार व कार्य देऊ शकते ( कलम 50 खालील अपील करण्याचा अधिकार सोडून व कलम 64 खालील ठराव करण्याचा अधिकार सोडून).

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा खर्च संचित निधीतून देणे**

17. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या सदस्यांना दिला जाणारा पगार व भत्ता आणि त्याचा व्यवस्थापकीय खर्च, . राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या अधिका-यांना व कर्मच्या-यांना दिले जाणारे पगार, भत्ते, लागू होणारे निवृत्ति वेतन हे भारताच्या संचित निधीतून दिले जातील.

## प्रकरण - 4

## राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची कार्ये आणि अधिकार

**राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे कार्य व अधिकार**

18.(1) कलम 3,4,6 मध्ये नमुद केलेले कार्यक्रम नियमित करणे, जैविक संसाधनाकडे पोहोच व योग्य तथा न्याय्य नफा वाटप याबाबतची मार्गदर्शक तत्वे ठरावाव्दारे देणे हे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे कर्तव्य आहे.

(2) कलम 3, 4 आणि 6 मध्ये नमूद केलेले कोणतेही कार्य हाती घेणेस राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण मान्यता देऊ शकते.

(3) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण -

(अ) केंद्र सरकारला जैविक विविधतेच्या संरक्षणाच्या बाबतीत, त्याच्या घटकांच्या पोषक उपयोगिते बाबत, जैविक संसाधनाच्या वापरातून मिळविलेल्या नफ्याच्या समभाग वाटपा बाबत सल्ला देऊ शकते;

(ब) जैविक विविधतेच्या दृष्टीने महत्व असलेल्या ठिकाणांची निवड करून ती कलम 37 पोट कलम (1) खाली वारसा स्थान म्हणून जाहीर करणेस तसेच अशा जागांच्या व्यवस्थापन उपाययोजनेबद्दल राज्य सरकारला सल्ला देऊ शकते;

(क) या कायद्यातील तरतूदींप्रमाणे जे कोणते कार्य करणे गरजेचे असेल ते करू शकते;

(4) भारतातून मिळविलेल्या जैविक संसाधना बाबत अथवा भारतातून अशा जैविक संसाधना संबंधीच्या ज्ञानाबाबत, भारताबाहेरील कोणत्याही देशास बौद्धिक मालमत्तेचे स्वामित्व मंजूरीस विरोध करणेस केंद्र सरकारचे वतीने राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण आवश्यक त्या उपाययोजना करू शकते.

## प्रकरण - 5

## राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची मान्यता

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाची काही कार्यक्रम हाती घेणेस मान्यता

19.(1) कलम 3 पोटकलम (2) मधील कोणाही व्यक्तीस ज्यांना भारतातील जैविक संसाधन अथवा त्या संबंधीची माहिती संशोधनासाठी अथवा वाणिज्य उपयोगासाठी अथवा जैविक सर्वेक्षणासाठी अथवा जैविक उपयोगासाठी अथवा भारतातील जैविक संसाधनाबाबत या भारतातून मिळविलेल्या जैविक संसाधनाचे संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरीत करणेसाठी हवी असेल त्यांनी विहित नमून्यात अर्ज करणेचा असून राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाकडे नेमून दिलेली फी भरणेची आहे.

(2) ज्या व्यक्तीस कलम 6 पोटकलम (1) मध्ये नमूद केले प्रमाणे भारतात अथवा भारताबाहेर सनद अथवा कोणत्याही स्वरुपाचे बौद्धिक मालमत्ता रक्षण हवे असेल त्यांनी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या विहित नमून्यात व ठराविक पध्दतीने अर्ज करणेचा आहे.

(3) पोट कलम (१) वा पोट कलम (२) मध्ये नमूद केलेला अर्ज प्राप्त झालेनंतर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण, त्यांना जरूर वाटेल ती योग्य चौकशी करून, गरज वाटलेस याबाबत तयार



करणेत तज्ञ समितीशी सल्ला मसलत करून त्याबाबत हुकूमाने मान्यता देऊ शकते, जी याबाबत करण्यात आलेल्या ठरावास पात्र राहून, त्यांना योग्य वाटेल त्या अटी व शर्तीस पात्र राहून जरूर तर मानधन देणेच्या अटीवर देणेची आहे अथवा लेखी हुकूमाने कारणे नमूद करून नाकारणेची आहेः

परंतु असा नाकारणेचा हुकूम संबंधित व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडणेची संधी न देता करता येणार नाही.

(4) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने या कलमाखाली दिलेल्या प्रत्येक मंजूरीची जाहीर सूचना दिली पाहीजे.

जैविक संसाधन व ज्ञानाचे हस्तांतरण

20.(1) कलम 19 खाली मान्यता मिळालेल्या कोणाही व्यक्तीस राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे परवानगी शिवाय, मान्यतेचा विषय असलेले कोणतेही जैविक संसाधन अथवा त्या बाबतचे ज्ञान हस्तांतरीत करता येणार नाही.

(2) ज्या व्यक्तीस पोट कलम (1) मध्ये नमूद केलेले जैविक संसाधन अथवा त्या बद्दलचे ज्ञान हस्तांतरण करणेचे असेल त्याने राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाकडे विहित नमून्यात व विहित पध्दतीने अर्ज केला पाहिजे.

(3) पोटकलम (2) मध्ये नमूद केलेला अर्ज प्राप्त झालेनंतर, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण, त्यांना जरुर वाटेल ती योग्य चौकशी करून, गरज वाटलेस याबाबत तयार करण्यात आलेल्या तज्ञ समितीशी सल्ला मसलत करून याबाबत हुकूमाने मान्यता देऊ शकते. ही मान्यता याबाबत करण्यात आलेल्या ठरावास पात्र राहून, त्यांना वाटेल त्या अटी व शर्तीस पात्र राहून, जरूर ते मानधन देणेच्या अटीवर देणेची आहे अथवा लेखी हुकूमाने कारणे नमूद करून नाकारणेची आहे.

परंतु असा नाकारणे चा हुकूम संबंधित व्यक्तीस म्हणणे मांडणेची संधी न देता करता येणार नाही.

(4) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने या कलमाखाली दिलेल्या प्रत्येक मंजूरीची जाहीर नोटीस दिली पाहिजे.

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने लाभाचा समभाग विनियोग ठरविणे

21.(1) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने कलम 19 व 20 खाली मान्यता देतांना खात्री करून घेणेची आहे की ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता दिली आहे त्यामुळे उपलब्ध

जैविक संसाधन, त्याची उत्पादने, नाविन्य व त्याच्या उपयोगाबद्दलच्या व वापराबद्दलच्या पध्दती व त्या संबंधीचे ज्ञान यातून मिळणा-या समभाग प्राप्तीची निश्चिती होत असून अर्ज करणारी व्यक्ति, संबंधित स्थानिक संस्था व नफ्याचे दावेदार यांच्यात परस्पर सामंजस्याने ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे वाटप होत आहे.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने, याबाबतच्या केलेल्या कोणत्याही ठरावास पात्र राहून नफ्याचे वाटपाची निश्चिती करणेची आहे व त्याची अंमलबजावणी खालीलपैकी सर्व वा एका मार्गाने करणेची आहेः-

(अ) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण अथवा जेथे नफ्यातील हिस्सा मागणारा दावेदर निश्चित केला आहे, अशा दावेदारास बौध्दिक मालमत्तेच्या स्वामित्वाची संयुक्त मालकी दिली जाईल;

(ब) तंत्रज्ञानाचे हस्तांतरण ;

(क) उत्पादन, संशोधन व विकासाची एकके यासाठी अशा जागा ठरविणे की जेणेकरून नफ्यातील दावेदारांचे राहणीमानाचा स्तर उंचाविणेस सहाय्य होईल;

(ड) जैविक संसाधन, जैविक सर्वेक्षण, जैविक उपयोगिता यातील संशोधन व विकास याच्याशी भारतीय शास्त्रज्ञ, नफ्यातील दावेदार व स्थानिक लोक यांची संगत;

(इ) नफ्यातील दावेदारांचे मदतीसाठी जोखिम भांडवल निधी स्थापन करणे;

(फ) नफ्यातील दावेदारांना राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणास योग्य वाटेल ती आर्थिक भरपाई अथवा अर्थाशिवाय इतर फायदे देणे.

(3) जेव्हां एखादी रक्कम नफ्यातील हिस्सा म्हणून देणेचा हुकूम केला जातो तेव्हां राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण सदरची रक्कम राष्ट्रीय जैविक विविधता फंडात जमा करणेचा हुकूम करू शकतेः

परंतु जेव्हां जैविक संसाधन अथवा ज्ञान ठराविक व्यक्तीकडून किंवा व्यक्तीच्या समूहाकडून वा संघटनेकडून प्रवेशाच्या परिणामी मिळालेले असते तेव्हां राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण करातील अटीस पात्र राहून वा त्यांना योग्य वाटेल त्या अटीस पात्र राहून सदरची रक्कम त्या व्यक्तीस वा व्यक्तीच्या समूहास वा संघटनेस वा संस्थेस प्रत्यक्ष देणेचा हुकूम करू शकते.

(4) या कलमाचे हेतूसाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण केंद्र सरकारशी सल्ला मसलत करून ठरावाने मार्गदर्शक तत्वे बनवू शकते.



## प्रकरण - 6

## राज्य जैविक विविधता मंडळ

**राज्य जैविक विविधता मंडळाची स्थापना**

22.(1) राज्य सरकार राज्यपत्रात याकरिता जी तारीख निश्चित करेल त्या तारखेस तेथील राज्य सरकारने या कायद्याच्या उद्दीष्टासाठी मंडळ प्रस्थापित करणेचे असून ते इइइ (राज्याचे नाव) जैविक विविधता मंडळ म्हणून ओळखले जाईल.

(2) या कलमाशी सहमत न राहता केंद्र शासित प्रदेशासाठी मात्र राज्य जैविक विविधता मंडळ प्रस्थापित केले जाणार नाही. केंद्र शासित प्रदेशासाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण अधिकार वापरेल व राज्य जैविक विविधता मंडळाचे त्या प्रदेशासाठी कार्य करतील:

परंतु कोणत्याही केंद्र शासित प्रदेशाबाबत राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण केंद्र सरकारने विशेष निर्देश केलेल्या कोणाही व्यक्तीस वा व्यक्तींचे समूहास या पोट कलमातील कोणतेही अधिकार वा कार्य देऊ शकते.

(3) वरील नावाने प्रस्थापित केलेले मंडळास शाश्वत उत्तराधिकार असेल व त्यास सामान्य मोहोर असेल, स्थावर-जंगम दोन्ही मिळकती मिळवणेचा, धारण करणेचा व व्यय करणेचा आणि करार करणेचा अधिकार असेल व त्या नावाने त्यांना वा त्यांचे विरुध्द दावा करावा लागेल.

(4) मंडळामध्ये खालील सदस्य असतील -

(अ) अध्यक्ष, जी व्यक्ती सुप्रसिध्द आहे व जिला जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत, पोषक उपगितेबद्दल आणि नफ्यातील हिश्याचे योग्य वाटपाबाबत पुरेसे ज्ञान आहे व माहिती आहे अशा व्यक्तीची राज्य सरकारने अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणेचि आहे;

(ब) राज्य सरकारने त्यांचे संबंधित खात्यांचे प्रतिनिधित्व करणेसाठी जास्तीत जास्त पांच व्यक्तींची पदसिध्द सदस्य म्हणून नेमणूक करणेची आहे;

(क) जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत, जैविक संसाधनाच्या पोषक उपयोगितेबद्दल आणि जैविक संसाधनाच्या वापरातून मिळणा-या नफ्याच्या योग्य वाटपाबाबत तज्ञ असणा-या व्यक्तींमधून जास्तीत जास्त पांच व्यक्तींची निवड करणेची आहे.

**राज्य जैविक विविधता मंडळाचे कार्य**

(5) राज्य सरकार राजपत्रात विशेष निर्देश करेल त्या ठिकाणी राज्य जैविक विविधता मंडळाचे मुख्य कार्यालय राहणेचे आहे.

23. राज्य जैविक विविधता मंडळाचे कार्य असे असेल -

(अ) केंद्र सरकारने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांना पात्र राहून राज्य सरकारला जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत, त्यातील घटकांची पोषक उपयोगिता व जैविक संसाधनाच्या वापरातून मिळविलेल्या नफ्याच्या योग्य वाटपाबाबत सल्ला देणे;

(ब) भारतीयांच्या कडून जैविक संसाधनाच्या वाणिज्य उपयोगाबाबत, जैविक सर्वेक्षणाबाबत, जैविक उपयोगितेबाबतची विनंती मंजूर, किंवा कसेही, करणेचे कार्य नियमित करणे;

(क) राज्य सरकारने नमूद केल्याप्रमाणे या कायद्यातील तरतूदींची अंमलबजावणी करणेच्या गरजेच्या दृष्टीने इतर सर्व आवश्यक कार्य करणे.

संरक्षणाच्या ध्येयाचे उल्लंघन करणा-या काही कृतींना पायबंद घालण्याचे राज्य जैविक विविधता मंडळाचे अधिकार इत्यादि

24. (1) ज्या भारतीय नागरीकास किंवा भारतात पंजीकृत केलेल्या व्यक्ती समूहास, संस्थेस अथवा संघटनेस कलम 7 मध्ये नमूद केलेला कोणताही कार्यक्रम हाती घेणेचा असलेस त्यांनी राज्य सरकारने विहित केलेल्या नमून्यात राज्य जैविक विविधता मंडळाकडे पूर्व सूचना दिली पाहिजे.

(2) पोट कलम (1) मध्ये नमूद केलेली पूर्व सूचना प्राप्त झाल्यानंतर राज्य जैविक विविधता मंडळ, संबंधित स्थानिक संस्थांशी चर्चा करुन, त्यांना योग्य वाटेल ती चौकशी करुन, त्यांचे मते जर सदरचे कार्य संरक्षणाच्या उद्देशास, जैविक विविधतेच्या पोषक उपयोगितेस अथवा सदरच्या कृतीमधून निर्माण होणा-या नफ्याच्या न्याय्य वाटपास विघातक अथवा तत्व विरोधी असेल तर हुकूमाने अशा कर्यास प्रतिबंध अथवा नियंत्रित करू शकतेः

परंतु अशा हुकूमाने बाधित होणा-या व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडणेची संधी दिल्याशिवाय असा हुकूम करता येणार नाही.

(3) पूर्व सूचनेसाठी पोट कलम (1) मध्ये दिलेली कोणतीही माहिती ही गोपनीय ठेवणेची असून ती सहेतूकपणे अथवा निर्हेतूकपणे याचेशि संबंध नसलेल्या व्यक्तीस उघड करणेची नाही.

कलम 9 ते 17 मधील तरतूदी दुरुस्तीसह राज्य जैविक विविधता मंडळास लागू

25. कलम 9 ते 17 मधिल तरतूदी राज्य जैविक विविधता मंडळास लागू असून त्यांची अंमलबजावणी खालील दुरुस्तीवर अवलंबून असेलः-

(अ) केंद्र सरकारशी संबंधित असे असलेल्या ठिकाणी राज्य सरकारशी संबंधित असे समजणेचे आहे;

(ब) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाशी संबंधित असे असलेल्या ठिकाणी राज्य जैविक विविधता मंडळ असे समजणेचे आहे;



(क) भारताचा संचित निधी याचा संदर्भ राज्याचा संचित निधी असा घेणेचा आहे.

## प्रकरण - 7

## राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे वित्त सहाय्य,लेखा व लेखा परीक्षण

केंद्र सरकारकडून अनुदान वा कर्ज

26. केंद्र सरकार, कायद्यान्वये विनियोग केल्यानंतर, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाला, अनुदान अथवा कर्जाच्या स्वरुपात जी रक्कम केंद्र सरकारला या कायद्याच्या उद्देशासाठी खर्च करणेस योग्य वाटेल, ती देऊ शकते.

राष्ट्रीय जैवविविधता निधी उभारणे

27.(1) जैवविविधता निधी या नावाने निधी उभारला जाईल व त्यामध्ये खालील रकमा जमा घेण्यात येतील -

(अ) कलम 26 अंतर्गत राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाला दिलेले कोणतेही अनुदान व कर्ज;

(ब) या कायद्याखाली राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाला प्राप्त झालेला सर्व मोबदला व स्वामित्वाची रक्कम; आणि

(क) केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या इतर स्रोतामधून राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या सर्व रकमा.

(2) निधीचा उपयोग खालील बाबींसाठी करणेचा आहे -

(अ) फायद्याचे दावेदारांपर्यंत फायदा पोहोचविणे;

(ब) जैविक संसाधनाच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी व ज्या क्षेत्रातून जैविक संसाधन अथवा त्याबद्दलचे ज्ञान उपलब्ध झाले आहे अशा क्षेत्राच्या विकासासाठी;

(क) संबंधित स्थानिक संस्थांशी चर्चा करुन कलम (ब) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्राच्या सामाजिक व आर्थिक विकासाठी.

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल

28. मागील आर्थिक वर्षातील संपूर्ण घडामोडींचा तपशील देणारा, प्रत्येक आर्थिक वर्षाचा वर्षिक अहवाल राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने विहित नमून्यात व विहित वेळेत तयार करणेचा

असून विहित वेळेपूर्वी केंद्र सरकारला देणेचा असून त्यासोबत लेखा परीक्षकाने मान्य केलेल्या हिशेबाची प्रत व लेखा परीक्षकाचा अहवाल देणेचा आहे.

अंदाजपत्रक, लेखा व लेखा परिक्षण

29.(1) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने अंदाजपत्रक तयार करणेचे असून योग्य लेखा व इतर संबधित कागदपत्रांची नोंद ठेवणेची असून (यात राष्ट्रीय जैविक विविधता निधीच्या लेख व

संबंधित कागदपत्रांचा समावेश आहे) केंद्र सरकारने विहित केलेप्रमाणे व भारताच्या नियंत्रक महालेखा परीक्षकाशी चर्चा करून वार्षिक लेखाविवरण पत्र तयार करणेचे आहे.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे लेखा भारताच्या नियंत्रक महालेखा परीक्षकाने, त्याने विहित केलेप्रमाणे ठराविक अवधीने तपासणेचे असून तपासणीसंबंधी जो खर्च झाला असेल तो राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने भारताच्या नियंत्रक महालेखा परीक्षकाला देणेचा आहे.

(3) भारताच्या नियंत्रक महालेखा परीक्षकाला सरकारच्या लेखा परीक्षणाबाबत जे अधिकार असतात, भारताच्या नियंत्रक महालेखा परीक्षकाला अथवा त्यांनी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या लेखा परीक्षणासाठी नेमलेल्या व्यक्तीला तेच अधिकार व विशेष अधिकार असतील, विशेषतः त्याला पुस्तके, लेखासंबंधी चलने, इतर दस्तऐवज व कागदपत्रे हजर करणेची मागणी करणेचा व राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे कोणतेही कार्यालय तपासणीचाधिकार असेल.

(4) भारताच्या नियंत्रक महालेखा परीक्षकाने अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या व्यक्तीने प्रमाणित केलेले राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे हिशेब त्याच्या लेखा परीक्षणाच्या अहवालासह दरवर्षी केंद्र सरकारकडे पाठविले पाहिजेत.

वार्षिक अहवाल संसदेसमोर ठेवणे

30. केंद्र सरकारने वार्षिक अहवाल व लेखा परीक्षा अहवाल प्राप्त झालेपासून लवकरात लवकर ते संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवले पाहिजेत.

## प्रकरण - 8

## राज्य जैविक विविधता मंडळाचे वित्त, लेखा व लेखा परीक्षण

राज्य जैविक विविधता मंडळास राज्य सरकारकडून अर्थसहाय्य

31. राज्य विधिमंडळाने कायद्याने यासाठी विनियोग केलेनंतर राज्य सरकार राज्य जैविक विविधता मंडळास अनुदान या कर्ज स्वरुपात, या कायद्याच्या उपयोगासठी जेवढी रक्कम योग्य वाटेल तेवढी देऊ शकते.

जैविक विविधता व्यवस्थापन समितीचे गठन

32.(1) राज्य जैविक विविधता निधी या नावाने निधी उभारला जाईल व त्यामध्ये खालील रकमा जमा घेणेच्या आहेत -

(अ) कलम 31 खाली राज्य जैविक विविधता मंडळास मिळालेले अनुदान अथवा कर्ज;

(ब) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने दिलेले अनुदान वा कर्ज;

(क) राज्य सरकारने ठरवून दिलेल्या इतर स्रोतातून राज्य जैविक विविधता प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या सर्व रकमा.



(2) राज्य जैविक विविधता निधीचा उपयोग खालील बाबींसाठी करणेचा आहे -

(अ) वारसा क्षेत्रांचे व्यवस्थापन व संरक्षण;

(ब) कलम 37 पोट कलम (1) खालील जाहीर सूचनेमुळे आर्थिकदृष्ट्या बाधित झालेल्या लोकांना नुकसान भरपाई देणेसाठी वा त्यांचे पुनर्वसनासाठी;

(क) जैविक संसाधनाच्या संरक्षणासाठी व पुनर्वर्धनासाठी;

(ड) संबंधित स्थानिक संस्थेशी चर्चा करून कलम 24 खाली केलेल्या कोणत्याही हुकूमाच्या अधिन राहून, ज्या क्षेत्रातून जैविक संसाधन अथवा त्याबद्दलची माहिती उपलब्ध झाली आहे त्या क्षेत्राच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी;

(इ) या कायद्याने अधिकृत केलेल्या कारणासाठी झालेला खर्च भरून काढणेसाठी.

राज्य जैविक विविधता मंडळाचा वार्षिक अहवल राज्य विधीमंडळासमोर ठेवणे

33. मागील आर्थिक वर्षाच्या संपूर्ण घडामोडींचा तप्शील देणारा प्रत्येक आर्थिक वर्षाचा अहवाल राज्य जैविक विविधता मंडळाने विहित नमून्यात व विहित वेळेत तयार करणेचा असून त्याची प्रत राज्य सरकारला देणेची आहे.

राज्य जैविक विविधता मंडळाचे लेखा परीक्षण

34. राज्याच्या महालेखा अधिका-याशी सल्लामसलत करून विहित केलेप्रमाणे राज्य जैविक विविधता मंडळाने लेखा ठेवणेचे व लेखा परीक्षण करून घेणेच असून, राज्य जैविक विविधता मंडळाने विहित केलेल्या तारखेपूर्वी राज्य सरकारला लेखा परीक्षित हिशेबाची प्रत, लेखा परीक्षण अहवालासह देणेची आहे.

राज्य जैविक विविधता मंडळाचा वार्षिक अहवाल राज्य विधीमंडळासमोर ठेवणे

35. राज्य सरकारने वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेपासून लवकरात लवकर ते राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवणेचे आहेत.

## प्रकरण - 9

# केंद्र व राज्य सरकारची कर्तव्ये

**केंद्र सरकारने जैविक विविधतेच्या संरक्षण इ. साठी आराखडा, योजना इत्यादि तयार करणे**

36.(1) जैविक संसाधनाचे बाबतीत संपन्न असलेल्या क्षेत्रांच्या निश्चितीसाठी वा त्यावर निगराणी ठेवणेसाठी, प्राकृतिवासात व प्राकृतिवासबाह्य वर्धन, जैविक संसाधनाचे संरक्षण, संशोधनाला उत्तेजन, जन-जागृती करणेच्या दृष्टीने प्रशिक्षण व लोकशिक्षण देणेसाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय योजना, आराखडे व कार्यक्रम विकसित करणेचे आहेत.

(2) जेव्हा केंद्र सरकारला, जैविक विविधता, जैविक संसाधने तसेच त्यांचा प्राकृतिवास, यांनी समृध्द क्षेत्रांना अतिरिक्त वापराचा, गैरवापराचा अथवा दुर्लक्षितेचा धोका असलेची खात्री झालेस त्यानी संबंधित राज्य सरकारला ताबडतोब सुधारणेच्या उपाययोजनेचे आदेश देणेचे असून अशा राज्य सरकारला जरूर ते व गरजेचे तांत्रिक व इतर सहाय्य देणेचे आहे.

(3) केंद्र सरकारने यथाशक्य जेथे जेथे संयुक्तिक वाटेल तेथे जैविक विविधतेचे संरक्षण, वर्धन व त्याचे पोषक उपयोगाचे दृष्टीने योजनेत, कार्यक्रमात व धोरणात संबंधित क्षेत्र व प्रतिक्षेत्र एकत्रित करणेचे आहे.

(4) केंद्र सरकारने खालील उपाययोजना हाती घेणेच्या आहेत,-

(i)ज्या ठिकाणी गरज असेल तेथे जैविक विविधतेवर प्रतिकूल परिणाम करण्याची शक्यता ज्या प्रकल्पांची आहे त्यांचेपरिणाम टाळणे अथवा सौम्य करणेच्या दृष्टीने पर्यावरणावरील परिणामांचे मूल्यमापन करणे व जेव्हा योग्य असेल तेव्हा अशा मूल्यमापनामध्ये लोकांचा सहभाग ठेवणे;

(ii) जैविक विविधतेच्या संरक्षणावर व त्याचे पोषक उपयोगावर व मानवी स्वास्थ्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असणा-या अशा, जैविक तंत्रज्ञानातून निर्माण होणा-या सजीवांच्या सुधारित जातींच्या वापरामुळे व प्रसारामुळे निर्माण होणारे धोके नियमित करणे, व्यवस्थापन करणे, अथवा नियंत्रित करणे.

(5) केंद्र सरकार राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या शिफारसी प्रमाणे जैविक विविधतेबदलच्या स्थानिक लोकांच्या ज्ञानाचा आदर व संरक्षण करेल. यात अशा स्थानिक, राज्य व राष्ट्रीय स्तरांवरील ज्ञानाचि नोंदणी करणे, तसेच रक्षणाचे अन्य उपाय योजणे, यामधे असाधारण प्रणालींचाही समावेश असेल.



खुलासाः- या कलमाचे उद्देशासाठी, -

(अ) प्राकृतिवासबाह्य संरक्षणछ म्हणजे जैविक विविधतेच्या घटकांचे त्यांचे नैसर्गिक स्थानाबाहेर संरक्षण;

(ब) च्यूळ प्राकृतिवासामध्ये संरक्षणछ म्हणजे परिसंस्थेचे संरक्षण आणि नैसर्गिक मूलस्थान व जातींची जीवितक्षम संख्या टिकविणे व त्याचे पुनरुज्जिवन करणे आणि प्रस्थापित किंवा पैदाईशी जातींचे बाबतीत, त्यांनी ज्या वातावरणात विशेष गुणधर्म जोपासले आहेत त्यामध्ये.

**जैविक विविधता वारसा क्षेत्र**

37.(1) अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्याचे तरतूदींना बाध न आणता राज्य सरकार वेळोवेळी स्थानिक संस्थांशी सल्लामसलतीने जैविक विविधतेच्या दृष्टीने महत्वाची असलेली क्षेत्रे या कायद्याखाली जैविक विविधतेची वारसा क्षेत्रे म्हणून अधिकृत राजपत्रात नमूद करु शकते.

(2) केंद्र सरकारशी सल्लामसलत करून राज्य सरकार सर्व वारसा क्षेत्राच्या व्यवस्थापन व संरक्षण यासाठी नियमावली तयार करू शकते.

(3) सदर राजपत्रातील घोषणेमुळे आर्थिक दृष्ट्या बाधित होणा-या व्यक्तीस वा लोकसमूहास नुकसान भरपाई देणेसाठी अथवा त्यांचे पुनर्वसनासाठी राज्य सरकरने योजना तयार करणेची आहे.

**केंद्र सरकारचे धोकाग्रस्त जाती जाहीर करणेचे अधिकार**

38. अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे तरतूदींना बाध न आणता केंद्र सरकारने संबंधित राज्य सरकारशी सल्लामसलत करून वेळोवेळी ज्या जाती नष्ट होणेच्या मार्गावर आहेत अथवा, धोक्यात असलेली जाती जी नजीकच्या भविष्य काळात नष्ट होण्याची शक्यता असेल तर, कोणत्याही उपयोगासाठी सदर जातीच्या संग्रहास प्रतिबंध करणेसाठी व तो नियमित करणेसठी तसेच सदर जातींचे पुनर्वसन व परिरक्षण यासाठी योग्य ति उपाययोजना करू शकते.

**केंद्र सरकारचे संग्रहालय निर्देशीत करणेचे अधिकार**

39.(1) केंद्र सरकार राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाशी सल्लामसलत करुन या कायद्याखाली विभिन्न वर्गवारीच्या जैविक संसाधनासाठी काही संस्थांना संग्रहालय म्हणून निर्देशित करू शकते.

(2) या संग्रहालयांनी जैविक साधन, त्यांचेकडे जमा केलेल्या प्रमाणपत्रित नमून्यासह सुरक्षाकक्षा मध्ये ठेवणेचे आहेत.

(3) एखाद्या व्यक्तीने नविन वर्गकाचा शोध लावल्यास तो संग्रहालयास अथवा संग्रहालयासाठी निर्देशित केलेल्या संस्थेस अधिसूचित करणेचा असून त्या व्यक्तीने नमूना वर्गक त्या संग्रहालयात अथवा संस्थेत जमा करणेचा आहे.

केंद्र सरकारचे काही जैविक संसाधनाना सूट देणेचे अधिकार

40. या कायद्यात जे नमूद आहे त्याशी असहमत राहून केंद्र सरकार राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाशी सल्लामसलत करुन राजपत्रात अधिसूचना देऊन जाहीर करू शकते की, व्यापारासाठी वापरल्या जाणा-या कोणत्याही वस्तूस, जैविक संसाधनासह, या कायद्यातील तरतूदी लागू होणार नाहीत.

## प्रकरण - 10

# जैविक विविधता व्यवस्थापन समित्या

राज्य जैवविविधता निधीची उभारणी

41.(1) प्रत्येक स्थानिक संस्थेने त्या क्षेत्रातील संरक्षणाला हातभार लावणे,पोषक उपयोग व जैविक विविधतेचे दस्तऐवज, ज्यामध्ये प्राकृतिवासाचे परिरक्षण, भूमिवंश, लोक-प्रकार व मशागतीत प्रजाती, पाळीव वंश आणि संकरित पशु,सूक्ष्मजीव यांचे संरक्षण आणि जैविक विविधतेच्या ज्ञानाचा कालक्रमानुसार वृत्तांत यांचा समावेश असेल, यासाठी जैविक विविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणेची आहे.

खुलासा. - या पोटकलमा करिता, -

(अ) च्संस्कारित प्रजातीछ म्हणजे वनस्पतीची अशी जात की जी शेतीमध्ये निर्माण झाली व वाढत राहीली किंवा केवळ शेतीसाठीच संकरित केली गेली होती;

(ब) च्लोक-प्रकारछ म्हणजे शेतीत विकसित केलेला, वाढविलेला आणि अनौपचारिकरित्या शेतक-यांचे दरम्यान अदान-प्रदान झालेला वनस्पतीचा प्रकार;

(क) च्भूमिवंशछ म्हणजे पुरातन संस्कारित प्रजाती जी प्राचीन शेतकरी व त्यांचे उत्तराधिकारी पिकवित आले.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण आणि राज्य जैविक विविधता मंडळे यांनी क्षेत्रीय अधिकारात येणा-या जैविक संसाधनाबाबत व त्यासंबंधीच्या माहितीबाबत कोणताही निर्णय घेतांना जैविक विविधता व्यवस्थापन समितीशी सल्लामसलत करणेची आहे.

(3) जैविक विविधता व्यवस्थापन समित्या त्यांच्या क्षेत्रीय अधिकारातील कोणतेही जैविक संसाधन वाणिज्य हेतूने एखाद्या व्यक्तीने मिळविले असेल किंवा संग्रह केला असेल तर त्या व्यक्तीकडून संग्रह फीच्या स्वरुपात कर वसूली करू शकतील.



## प्रकरण - 11

# स्थानिक जैविक विविधता निधी

स्थानिक जैवविविधता निधीला अनुदान

42. राज्य विधीमंडळाने कायद्याने यासाठी विनियोग केलेनंतर राज्य सरकार, स्थानिक जैविक विविधता निधी , अनुदान वा कर्ज स्वरुपात या कायद्याच्या उपयोगासाठी जेवढी रक्कम योग्य वाटेल तेवढी देऊ शकते.

43.(1) राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या प्रत्येक ठिकाणी कोणतीही स्वराज्य संस्था कार्यरत असेल तेथे स्थानिक जैविक विविधता निधी या नावाचा निधी उभारला जाईल व त्यामध्ये खालील रकमा जमा घेण्यात येतील -

(अ) कलम 42 खालील कोणतेही अनुदान आणि कर्ज;

(ब) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने दिलेले कोणतेही अनुदान वा कर्ज;

(क) राज्य जैविक विविधता मंडळाने दिलेले कोणतेही अनुदान वा कर्ज;

(ड) जैविक विविधता व्यवस्थापन समितीस कलम 41 पोट कलम (3) अन्वये प्राप्त झालेली फी;

(इ)) राज्य सरकारने ठरविले प्रमाणे स्थानिक जैविक विविधता निधीस अन्य मार्गाने प्राप्त झालेल्या सर्व रकमा.

स्थानिक जैवविविधता निधीचा वापर

44.(1) पोट कलम (2) च्या तरतूदींना पात्र राहून, राज्य सरकार विहित करेल त्या प्रमाणे स्थानिक जैविक विविधता निधीचे व्यवस्थापन व ताबा, आणि त्याच कारणासाठी निधीचा उपयोग, राहिल.

(2) संबंधित स्थानिक संस्थेच्या अधिकार क्षेत्रात येणा-या जैविक विविधतेच्या संरक्षणासाठी सुसंगत अशा सामाजिक फायद्यासाठी त्या निधीचा वापर करणेचा आहे.

जैविक विविधता व्यवस्थापन समिताचा वार्षिक अहवाल

45. ज्या व्यक्तीकडे स्थानिक जैविक विविधता निधीचा ताबा असेल त्याने विहित नमुन्यात विहित वेळेत मागील आर्थिक वर्षाच्या घडामोडींचा पूर्ण लेखा देणारा, प्रत्येक आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल त्यार करणेचा असून संबंधित स्थानिक संस्थेस त्याची प्रत देणेची आहे.

जैविक विविधता व्यवस्थापन समिताचे लेखा परीक्षण

46. राज्याच्या महालेखा परीक्षकाशी सल्लामसलत करून विहित केलेप्रमाणे स्थानिक जैविक विविधता निधीचे हिशेब ठेवले पाहिजेत व त्याचे लेखा परीक्षण केले पाहिजे. स्थानिक जैविक विविधता निधी ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीने संबंधित स्थानिक संस्थेस विहित तारखेपूर्वी लेखा परीक्षण केलेल्या हिशेबाची प्रत, लेखा परीक्षकाचे अहवालासह दिली पाहिजे.

जैविक विविधता व्यवस्थापन समिताचे वार्षिक अहवाल इ. जिल्हा दंडाधिका-यांना सादर करणे

47. कलम 41 पोटकलम (1) खाली जैविक विविधता निधीचे व्यवस्थापन समिती तयार करणा-या प्रत्येक स्थानिक संस्थेने, कलम 45 व 46 मध्ये नमूद केलेप्रमाणे व ज्या समितीच्या संदर्भातील वार्षिक अहवाल, स्थानिक संस्था ज्याच्या अधिकारक्षेत्रात येत असेल त्या जिल्हा दंडाधिका-याकडे सादर केला पाहिजे.

## प्रकरण - 12

## संकीर्ण

केंद्र सरकारने केलेल्या सूचना राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणास बंधनकारक

48.(1) या कायद्यातील तरतूदींना बाध न येता, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणावर, या कायद्याखालील कार्य व कर्तव्ये पार पाडत असतांना, त्याचे धोरणाबाबत केंद्र सरकार वेळोवेळी ज्या लेखी सूचना देईल त्या बंधनकारक राहतील :

परंतु या पोट कलमाखाली सूचना देणेपूर्वी, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाला त्यांचे मत मांडणेची संधी, जेवढी शक्य असेल तेवढी, दिली गेली पाहिजे.

(2) याबाबतचा प्रश्न धोरणाचा असो वा नसो, केंद्र सरकारचा निर्णय अंतिम राहील.

राज्य सरकारचे सूचना देणेचे अधिकार

49. कायद्यातील तरतूदींना बाध न येता, राज्य जैविक विविधता मंडळावर, या कायद्यातील कार्ये व कर्तव्ये पार पाडत असतांना, धोरणाचे प्रश्नाबाबत राज्य सरकार वेळोवेळी ज्या लेखी सूचना देईल त्या बंधनकारक राहतीलः

परंतु अशा सूचना देणेपूर्वी राज्य जैविक विविधता मंडळास त्यांचे मत मांडणेची संधी, जेवढी शक्य असेल तेवढी, दिली गेली पाहिजे.

(2) प्रश्न धोरणाचा असो वा नसो, याबाबतचा राज्य सरकारचा निर्णय अंतिम राहील.



राज्य जैविक विविधता मंडळातील वाद मिटविणे

50.(1) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण व राज्य जैविक विविधता मंडळ यांचेत वाद निर्माण झालेस, यथा परिस्थिती, प्राधिकरणाने वा मंडळाने विहित कालावधित केंद्र सरकारकडे अपील केले पाहिजे.

(2) पोट कलम (1) खाली केलेले प्रत्येक अपील हे केंद्र सरकारने विहित केलेल्या नमून्यात केले पाहिजे.

(3) सदरचे अपील केंद्र सरकारने विहित केलेल्या पध्दतीने निकाली काढले पाहिजेः

परंतु सदरचे अपील निकाली करणेपूर्वी पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेची योग्य संधी दिली गेली पाहिजे.

(4) जर राज्य जैविक विविधता मंडळामध्ये वाद निर्माण झाला तर केंद्र सरकारने तो राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाकडे सोपविला पाहिजे.

(5) पोट कलम (4) खालील कोणत्याही वादाचा न्याय निर्णय करतांना राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने नैसर्गिक न्याय्य तत्वांचा मार्गदर्शनपर वापर केला पाहिजे व सरकारने विहित केलेली पध्दती वापरली पाहिजे.

(6) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणास, या कलमातील कार्ये करतांना दिवाणी न्यायालयास, दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 ने खालील बाबतीत जे अधिकार दिले आहेत ते अधिकार असतात,अनुक्रमे;- 1908 चे 5

(अ) कोणाही व्यक्तीस हजर राहणेस व शपथेवर जबाब देणेस भाग पाडणेसाठी समन्स काढणेस;

(ब) एखाद्या दस्तऐवजाचा शोध घेऊन ते हजर करणेस;

(क) प्रतिज्ञापत्रावर पुरावा स्विकारणेस;

(ड) साक्षिदाराचे जबाब घेणेस व कागदपत्र घेणेस कमिशन काढणेस;

(इ) स्वतःचे निर्णयाचे पुनरावलोकन करणेस;

(फ) अर्जदाराचे गैरहजरीबद्दल अर्ज रद्द करणेस अथवा एकतर्फी निर्णय करणेस;

(ग) अर्ज रद्द करणेबाबत केलेला हुकूम अथवा एकतर्फी हुकूम रद्द करणेस;

(ह) विहित केलेले इतर कोणतेही कार्य.

1860 चे 45

1974 चे 2

(7) भारतीय दंड विधान संहिता कलम 193 व 228 अंतर्गत आणि कलम 196 साठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणासमोर चालणारे सर्व कामकाज हे न्यायालयीन कामकाज समजले जाईल व दंड प्रक्रिया संहिता 1973 प्रकरण 26 कलम 195 प्रमाणे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण हे फ़ौजदारी न्यायालय समजणेचे आहे.

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण व राज्य जैविक विविधता मंडळाचे सदस्य, अधिकारी इ. लोकसेवक समजणे

1860 चे 45

51. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण किंवा राज्य जैविक विविधता मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे कार्य या कायद्याचे तरतूदी खाली असेल अथवा त्या स्वरुपाचे असेल तेव्हा ते भारतीय दंड विधान संहिता कलम 21 खालील लोक सेवक समजले जातात.

अपील

52. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण अथवा राज्य जैविक विविधता मंडळाच्या नफ़ा हिश्श्याच्या निर्णयाने वा इतर हुकूमाने बाधित होणारी व्यक्ती, सदर निर्णयाची व हुकूमाची माहिती झालेपासून तीस दिवसाचे आत राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण किंवा राज्य जैविक विविधता मंडळाचे, यथा स्थिती, निर्णयाविरूध्द वा हुकूमाविरूध्द उच्च न्यायालयात अपील करू शकतेः

परंतु अपील करणारी व्यक्ति विहित काळात अपील करणे पासून योग्य कारणामुळे प्रतिबंधित झाली आहे असे उच्च न्यायालयाचे समाधान झालेस, उच्च न्यायालय पुढील काळातही परंतु साठ दिवसाचे आत सदर व्यक्तीस अपील दाखल करणेस परवान्गी देऊ शकते.

निर्णय वा हुकूमाची अंमलबजावणी

53. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने किंवा राज्य जैविक विविधता मंडळाने या कायद्यातील नफ़्याचे हिश्श्याबाबत निर्णय वा इतर हुकूम केला असेल, अथवा राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण अथवा राज्य जैविक विविधता मंडळाच्या निर्णयाच्या विरुध्द वा हुकूमाविरुध्द केले अपीलात उच्च न्यायालने हुकूम केला असेल तर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे किंवा राज्य जैविक विविधता मंडळाचे अधिकार्याने अथवा उच्च न्यायालयचे रजिस्ट्रार, यथास्थिति, यानी दिलेले प्रमाणपत्र हे दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा समजणेचा आहे व त्या प्रमाणपत्राची, दिवाणी न्यायलयाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच अंमलबजवणी करणेची आहे.

खुलासा. - या कलमासाठी व कलम ५२ साठी च्राज्य जैविक विविधता मंडळ च या शब्दात ज्या व्यक्तींना व व्यक्ती समूहास कलम २२ पोट कलम (२) खालील अधिकार व कार्ये त्याच पोटकलमाचे परंतुकाखाली दिली गेली आहेत, त्या व्यक्ती व व्यक्तीसमूह अंतर्भूत असून, त्या व्यक्तींसंबंधी व व्यक्तीसमूहासंबंधीचे प्रमाणपत्र त्या व्यक्तीने अथवा व्यक्तीसमूहाने, यथास्थिती, देणेचे आहे.



सद्हेतूने घेतलेल्या निर्णयाचे रक्षण

54.या कायद्याखालील किंवा या कायद्याचे नियमास व उपनियमास अधिन राहून सद्भावाने केल्या गेलेल्या अथवा करणेचा हेतू असलेल्या कोणत्याही कृतीबाबत केंद्र सरकार अथवा राज्य सरकार अथवा राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण वा राज्य जैविक विविधता मंडळाचे कोणाही सदस्य, अधिकारी वा कर्मचारी यांचे विरूध्द कोणताही दावा, फ़ौजदारी अथवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

दंड

55.(1) जी व्यक्ती कलम 3 वा कलम 4 अथवा कलम 6 च्या तरतूदींचा भंग करते अथवा भंग करणेचा प्रयत्न करते वा भंग करण्यास प्रोत्साहन देते ती व्यक्ती पाच वर्षापअर्यंतच्या वा दहा लाखापर्यंतच्या दंडास अथवा ज्या ठिकाणी झालेली नुकसानी दहा लाखापेक्षा अधिक असेल त्या ठिकाणी नुकसानी इतक्या दंडास वा दोन्हीस पात्र राहील.

(2) जी व्यक्ती कलम 7 मधील तरतूदींचा वा कलम 24 पोटकलम (2) मधील हुकूमाचा भंग करते अथवा भंग करणेचा पयत्न करते वा भंग करणेस प्रोत्साहित करते ती व्यक्ती तीन वर्षापर्यंतचे कारावासास वा पाच लाखपर्यंतचे दंडास अथवा दोन्हीस पात्र राहील.

केंद्र सरकार, राज्य सरकार, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण व राज्य जैविक विविधता मंडळ यांच्या सूचना वा हुकूमाचा भंग केलेस दंड

56. जर एखाद्या व्यक्तीने केंद्र सरकारने, राज्य सरकारने, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने अथवा राज्य जैविक विविधता मंडळाने दिलेल्या सूचनेचा अथवा हुकूमाचा भंग केला तर, व ज्या करिता या कायद्याखाली स्वतंत्र शिक्षेची तरतूद केली नसेल तर ती व्यक्ती एक लाख पर्यंतचे दंडास व गुन्हा दुस-यांदा व वेळोवेळी केला गेला तर, भंग चालू ठेवलेबदल त्या प्रत्येक दिवसाचे भंगाकरिता दोन लाखापर्यंतच्या अधिकच्या दंडास पात्र राहील.

कंपन्यांनी केलेले गुन्हे

57.(1) या कायद्याखालील तरतूदींचा भंग अथवा गुन्हा एखाद्या कंपनीने केला असलेस, गुन्हा अथवा भंग घडतेवेळी जी व्यक्ती अधिकारात असेल वा जी व्यक्ती कंपनीच्या धंद्यास त्यावेळी जबाबदार असेल,ती व्यक्ती व त्याचप्रमाणे कंपनीही सदर गुन्ह्यास वा भंगासाठी दोषी समजण्यात येऊन त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई होऊन त्याप्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

परंतु सदर व्यक्तीने, सदरचा गुन्हा वा भंग त्याला माहिती नसताना केला गेलेचे अथवा त्या व्यक्तीने सदरचा गुन्हा वा भंग होऊ नये म्हणून सर्व योग्य ती काळजी घेतलेचे शाबीत केलेस सदरची व्यक्ती या पोटकलमातील शिक्षेस पात्र राहणार नाही.

(2) वरील पोटकलम (1) मध्ये कांहीही म्हटले असले तरी या कायद्याखालील तरतूदींचा भंग वा गुन्हा कंपनीने केला असेल व एखाद्या संचालक, व्यवस्थापक, सचिव अथवा कंपनीच्या इतर अधिका-यांचे संमतीने, वा त्यांचे मौनामुळे वा सदरचा गुन्हा किंवा भंग त्यांचे हलगर्जीपणामुळे घडला असा आरोप करण्यासारखे असेल, तेव्हा सदरचा संचालक, व्यवस्थपक, सचिव वा अधिकारी संदरच्या गुन्ह्याबाबत व भंगाबाबत दोषी समजणेत येईल व तो कायदेशीर कारवाईस, त्या प्रमाणे होणा-या शिक्षेस पात्र राहील.

खुलासा. - या कलमाचे संदर्भात,-

(अ) च्कंपनी च म्हणजे कोणतीही संयुक्त संस्था ज्यात पेढी वा इतर व्यक्तींची संघटना समाविष्ट आहे; आणि

(ब) च्संचालकछ, पेढीसंदर्भात, म्हणजे त्या पेढीतील भागिदार.

दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हे

58. या कायद्याखालील गुन्हे हे दखलपात्र व अजामिनपात्र आहेत.

हा कायदा अन्य कायद्याचे खेरीज परिणामी

59. या कायद्यातील तरतूदी, वन वा वन्य जीवांबद्दलच्या अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या तरतूदींखेरीज असून, या त्यांची हानी करणा-या नाहीत.

केंद्र सरकारचे राज्य सरकारला सूचना देणेचे अधिकार

60.या कायद्याखालील कोणत्याही तरतूदी, नियम वा उपनियम यांची राज्यात अंमलबजावणी करणेसाठी केंद्र सरकार राज्य सरकारला सूचना देऊ शकते.

गुन्ह्याची दखल

61. कोणत्याही न्यायालयास या कायद्याखालील गुन्ह्यांची दखल, खाली नमूद केलेल्या तक्रारींव्यतिरिक्त, घेता येणार नाही -

(अ) केंद्र सरकार अथवा त्या करिता सरकारने अधिकृत केलेल्या व्यक्ती वा अधिका-याने; किंवा

(ब) केंद्र सरकारला अथवा वर नमूद केलेप्रमाणे त्यांनी अधिकृत केलेल्या अधिकार मंडाळास अथवा अधिका-यास सदर गुन्ह्याबद्दल विहित नमून्यात तीस दिवसांची सूचना देऊन कोणाही नपयातील दावेदाराने.



केंद्र सरकारचे नियम करणेचे अधिकार

62.(1) केंद्र सरकार या कायद्याचे हेतूसाठी अधिकृत राजपत्रात अधिसूचना देऊन नियम करू शकते.

(2) वरील अधिकारास बाध न येता विषेश करून खालीलपैकी सर्व अथवा कोणत्याही गोष्टीकरिता नियम करू शकते, अनुक्रमेः-

(अ) कलम 9 खालील अध्यक्ष व सदस्यांचे सेवेबाबतच्या अटी व शर्ती;

(ब) कलम 10 खालील अध्यक्षाचे अधिकार व कर्तव्ये;

(क) कलम 12 पोट कलम (1) खालील सभेचे काम चालविणे बाबतच्या पध्दती संदर्भात;

(ड) कलम 19 पोट कलम (1) खालील काही कार्य करण्यासाठी कराव्या लागणा-या अर्जाचा नमूना व घ्याव्या लागणा-या फ़ी बाबत;

(इ) कलम 19 पोटकलम (2) खाली कराव्या लागणा-या अर्जाच्या नमून्या बाबत;

(फ़) कलम 20 पोटकलम (2) खाली कराव्या लागणा-या अर्जाचा नमूना व जैविक संसाधनाचे अथवा त्याचे माहितीचे हस्तांतरणाचे पध्दती बाबत;

(ग) कलम 28 पोटकलम (2) खाली राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने कोणत्या नमून्यात व कोणत्या वेळी प्रत्येक आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल तयार करणेचा व कोणत्या तारखेपूर्वी लेखा परीक्षित हिशेबाची प्रत, लेखा परीक्षकाचे अहवालासह देणेची आहे;

(ह) कलम 29 पोटकलम (1) खाली हिशेबाच्या वार्षिक अहवालाच्या तक्त्याचा नमूना तयार करणे;

(ई) कलम 50 खाली ज्या वेळेत व ज्या नमून्यात अपील करणेबाबत, अपील निकाली करणेच्या पध्दतीबाबत, न्याय निर्णय करणेच्या पध्दतीबाबत;

(ज) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण अधिकच्या बाबींसाठी कलम 50 पोटकलम (6) उपकलम (ह) खाली दिवाणी न्यायालयाचे अधिकार वापरू शकते;

(क) कलम 61 उपकलम (ब) खाली नोटीस देणेच्या पध्दतीबाबत;

(ल) इतर कोणताही विषय जो विहित केला जाणेचा आहे किंवा केला जाईल, किंवा ज्याबबत नियमाद्वारे तरतूद करणेची आहे.

(3) या कलमाखली केलेला प्रत्येक नियम आणि या कायद्याखाली केलेला प्रत्येक ठराव तो केल्यानंतर लगेच संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर जेव्हां सभागृह तीस दिवसांचे सत्रासठी असेल, जे सत्र सलग एकच असेल वा दोन किंवा अधिक सलग सत्रात असेल आणि वर नमूद केलेप्रमाणे ते सत्र वा सलगचे सत्र संपणेपूर्वी दोन्ही सभागृहात सदरच्या नियमात वा ठरावात सुधारणा करणेस मान्यता दिली असेल किंवा सदरचा नियम या ठराव रद्द करावा असे दोन्ही सभागृहांनी मान्य केलेस सदरचा नियम वा ठराव केवळ त्या दुरुस्ती स्वरुपातच परिणामी होईल वा यथास्थिति परिणामी होणार नाही; तथापि सदरची दुरुस्ती अथवा रद्द करणेची कृती त्या नियमाखाली वा ठरावाखाली पूर्वी केलेल्या कोणत्याही कृतीच्या कायदेशीरपणाला बाध न आणता होणेची आहे;

**राज्य सरकारचे नियम करण्याचे अधिकार**

63. (1) या कायद्याच्या उद्दीष्टपूर्तीसाठी राज्य सरकार अधिकृत राजपत्रात अधिसूचित करून नियम करू शकते.

(2) विशेष करून आणि पूर्वीच्या दिलेल्या अधिकारांच्या सर्वसामान्यतेला बाध न आणता खालील सर्व अथवा त्यापैकी एखाद्या बाबीसाठी नियम करू शकते, अनुक्रमेः-

(अ) कलम 23 उपकलम (क) खाली राज्य जैविक विविधता मंडाळाने करणेची इतर कार्ये;

(ब) कलम 24 पोटकलम (1) खाली पूर्व सूचना देणेसाठीचा नमून;

(क) कलम 33 खाली तयार केला जाणारा प्रत्येक आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल केव्हां तयार करावयाचा त्या वेळेबाबत व कोणत्या नमून्यात तयार करणेचा याबाबत;

(ड) राज्य जैविक विविधता मंडाळाने हिशेब ठेवणेची व लेखा परीक्षण करणेची पध्दती व कलम 34 खाली लेखा परीक्षित हिशेबाची प्रत, लेखा परीक्षण अहवालासह कोणत्या तारखेपूर्वी हजर करणेची याबाबत;

(इ) कलम 37 खाली राष्ट्रीय वारसा स्थळांचे व्यवस्थापन व संरक्षणाबाबत;

(फ) स्थानिक जैविक विविधता निधीचा ताबा व त्याचे व्यवस्थापनाचे पध्दतीबाबत व सदरचा निधी कलम 44 पोटकलम (1) खाली कोणत्या उद्दीष्टांसाठी वापरणे याबाबत;

(ग) वार्षिक अहवालाचे स्वरूप व कलम ४५ खाली प्रत्येक आर्थिक वर्षात तो अहवाल कोणत्या वेळेस तयार करणेचा याबाबत;



(ह) स्थानिक जैविक विविधता निधीचे हिशेब कोणत्या पध्दतीने ठेवणेचे व लेखा परीक्षित करणेचे आणि परीक्षित हिशेबाची प्रत, लेखा परिक्षकाचे अहवालासह कलम 46 खाली कोणत्या तारखेपूर्वी हजर करणेची याबाबत;

(ई) इतर जे विषय विषेश उल्लेख करणेचे या केले जाणेचे आहेत.

(3) या कलमाखाली राज्य सरकारने तयार केलेले नियम तयार केलेपासून लगेच राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर, जेव्हां दोन स्सभागृहे असतील, व जेव्हां एकच सभागृह असेल तेव्हां त्या सभागृहासमोर ठेवणेचे आहेत.

**ठराव करणेचे अधिकार**

64. राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाने केंद्र सरकारचे पूर्व परवानगीने अधिकृत राजपत्रात अधिसूचित करून या कायद्याच्या हेतूचे कार्यवाहीसाठी ठराव करणेचे आहेत.

**अडचणी दूर करणेचे अधिकार**

65.(1) या कायद्यातील तरतूदींचे अंमलबजावणीचे कामी काही अडचण निर्माण झालेस केंद्र सरकार या कायद्याच्या तरतूंशी विसंगत नसलेल्या हुकूमाने ती अडचण दूर करू शकतेः

परंतु या कायद्याचे आरंभापासून दोन वर्षाचे कालावधीनंतर असा कोणताहि हुकूम करता येणार नाही.

(2) या कलमाखाली केलेला प्रत्येक हुकूम, तो होताच संसदेच्या प्रत्येक सभागृहासनोर ठेवला पाहिजे.

सुभाष सी. जैन

सचिव, भारत सरकार

# जैविक विविधता नियम - 2004



## पर्यावरण आणि वन मंत्रालय

### अधिसूचना

नवी दिल्ली, 15 एप्रिल, 2004

G.S.R.261(E).- जैविक विविधता कायदा 2002 कलम 62 ने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण ( अध्यक्ष व इतर सदस्यांचे पगार भत्ते आणि सेवेच्या अटी ) नियम 2003 रद्द करुन, सदर रद्द करणेच्या कृतीपूर्वी ज्या गोष्टी केल्या असतील अथवा करणेच्या वगळल्या असतील त्या सोडून, केंद्र सरकार खालील नियम बनवित आहे; अनुक्रमेः-

1. संक्षिप्त मथळा आणि प्रारंभ

(1) या नियमांना जैविक विविधता नियम, 2004, असे म्हणून संबोधता येईल.

(2) 15 एप्रिल, 2004 पासून सदरचे नियम अस्तित्वात येतील.

2. व्याख्या

या नियमात, संदर्भाने इतर काही सूचित केले नसेल तर,-

(अ) च्कायदा च म्हणजे जैविक विविधता कायदा 2002 ( 2003 चे 18 );

(ब) च्प्राधिकरणछ म्हणजे कलम 8 पोटकलम (1) खाली प्रस्थापित राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण;

(क) च्जैविक विविधता व्यवस्थापन समितीछ म्हणजे कलम 41 पोटकलम (1) खाली स्थानिक संस्थेने प्रस्थापित केलेली जैविक विविधता व्यवस्थापन समिती;

(ड) च्अध्यक्षछ म्हणजे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा अध्यक्ष अथवा राज्य जैविक विविधता मंडळाचा अध्यक्ष, यथास्थिती;

(इ) च्फीछ म्हणजे नमूद केलेल्या अटीनुसार फी;

(फ) च्नमुनाछ म्हणजे या नियमांना परीशिष्ठीत केलेला नमूना;

(ग) च्सदस्यछ म्हणजे राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचा सदस्य अथवा राज्य जैविक विविधता मंडळाचा सदस्य, यामध्ये अध्यक्षाचा समावेश होतो, यथास्थिती;

(ह) च्कलमछ म्हणजे या कायद्यातील कलम;

(ज) च्सचिवछ म्हणजे प्राधिकरणाचा पूर्ण वेळ सचिव;

(ल) शब्द व रचना ज्यांचा वापर नियमात केला आहे परंतु ज्यांची व्याख्या नियमात दिलेली नाही, आणि कायद्यात त्यांची व्याख्या दिली असेल तर कायद्यात दिलेला संबंधित अर्थच त्यांना देणेचा आहे.

3. अध्यक्षाच्या निवडीची व नेमणूकीची पध्दत

(1) प्राधिकरणाचा अध्यक्ष केंद्र सरकारने नेमणेचा आहे.

(2) पोटकलम (१) खालील अध्यक्षाची प्रत्येक नियुक्ती ही केंद्र सरकार बाहेरील इतराची निवड करुन अथवा प्रतिनिधी म्हणून नेमणूक करुन केली जाईल. प्रातिनिधीक स्वरुपात नेमणूक केली जात असताना अर्जदार हा भारत सरकारच्या सहसचीवापेक्षा कमी दर्जाचा असू नये.

4. अध्यक्षाचा कालावधी

(1) प्राधिकरणाच्या अध्यक्षाने तीन वर्षाच्या कालावधीसाठी पद धारण करणेचे आहे तथापि तो पुनर्नेमणूकीस पात्र राहील,

परंतु कोणाही अध्यक्षास, ज्याने वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्याच्या पदाचा कालावधी संपलाआहे, यापैकी जे आधी असेल, त्यानंतर पद धारण करता येणार नाही.

(2) अध्यक्ष, केंद्र सरकारला कमित कमी एक महिन्याची लेखी पूर्व सूचना देऊन आपले पदाचा राजीनामा देऊ शकतो.

5. अध्यक्षाचे वेतन व भत्ते

(1) अध्यक्षास दरमहा निश्चित स्वरुपात रु.26,000/- वेतन मिळणेचा हक्क आहे. एखाद्या निवृत्त व्यक्तीची अध्यक्ष म्हणून नियुक्ति केली असेल तर त्या व्यक्तीला लागू होणा-या केंद्र सरकारच्या हुकूमाप्रमाणे त्याचे वेतन निश्चित केले जाईल.

(2) केंद्र सरकारने वेळोवेळी ठरविले प्रमाणे अध्यक्षास भत्ते, रजा, निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, घर व इतर पूर्वापेक्षित इत्यादि मिळणेचा हक्क आहे.

6. बिनसरकारी सदस्यांच्या पदाचा कालावधी व भत्ते

(1) प्राधिकरणाच्या प्रत्येक बिनसरकारी सदस्याने, राजपत्रात त्याच्या नियुक्तीचे जाहीरीकरणाचे तारखेपासून तीन वर्ष पर्यंतचे कालावधीसाठी पद धारण करणेचे आहे.

(2) केंद्र सरकारच्या आयोगाच्या आणि समित्याच्या बिनसरकारी सदस्यांना आयोगाच्या व समित्यांच्या सभेस हजर राहणेसाठी जेवढा भत्ता दिला जातो तेवढा बैठक भत्ता, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता आणि इतर भत्ते, बिनसरकारी सदस्याला, प्राधिकरणाचे सभेस हजर राहणेसाठी मिळणेचा हक्क आहे.

7. बिनसरकारी सदस्यांची रिक्त पदे भरणे

(1) बिनसरकारी सदस्य, केंद्र सरकारला उद्देशून स्वतःचे हस्ताक्षरात लेखी कळवून कोणत्याही वेळी स्वतःचे पदाचा राजिनामा देऊ शकतो आणि त्या सदस्याचे प्राधिकरणातील पद रिक्त होते.

(2) प्राधिकरणातील बिनसरकारी सदस्याचे आकस्मिक रिक्त होणारे पद हे नविन नामनिर्देशाने भरले जाते व नामनिर्देशित सदस्य ज्या सदस्याच्या जागी नामनिर्देषीत असेल त्याच्या शेष कालावधी पुरताच पद धारण करू शकतो.



8. प्राधिकरणाच्या सदस्यास दूर करणे

केंद्र सरकाने नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिका-याने, जो भारत सरकारच्या सचिवाच्या दर्जाचे खाली नसेल, जरुर व योग्य ती चौकशी केलेशिवाय, व संबंधित सदस्याला त्याबाबत योग्य ती संधी दिले शिवाय प्राधिकरणाचे कोणत्याही सदस्याला कलम 11 मध्ये नमूद केले कारणासाठी त्याचे पदावरून दूर करता येणार नाही.

9. प्राधिकरणाचा सचिव

(1) प्राधिकरणाने त्यांचेसाठी सचिवाची नियुक्ती करणेची आहे.

(2) सचिवाच्या नेमणूकी बाबतच्या अटी व शर्ती प्राधिकरणाने ठरावाने निश्चित करणेच्या आहेत.

(3) प्राधिकरणाची सभा बोलाविणे व ती योग्यप्रकारे पार पाडणे, प्राधिकरणाच्या कानकाजाचे कागदपत्र योग्य प्रकारे ठेवणे व प्राधिकरणाने सोपविलेल्या इतर सर्व बाबीस सचिव जबाबदार राहिल.

10. प्राधिकरणाची सभा

(1) प्राधिकरणाने एक वर्षात किमान चार वेळा, सर्व साधारणपणे दर तीन महिन्यांनतर प्राधिकरणाचे मुख्य कर्यालयात अथवा अध्यक्षांनी निश्चित केले ठिकाणी एकत्र येणेचे आहे.

(2) प्राधिकरणाचे किमान पाच सदस्यांचे लेखी विनंती वरून अथवा केंद्र सरकाचे आदेशाप्रमाणे अध्यक्षांनी प्राधिकरणाची विशेष सभा बोलाविणेची आहे.

(3) सदस्यांना, सर्वसाधारण सभा बोलविणेपूर्वी किमान पंधरा व विशेष सभेपूर्वी किमान तीन दिवसांची, सभेचे विषय,वेळ व जागा नमूद करून सूचना दिली पाहिजे.

(4) अध्यक्ष हा प्रत्येक सभेचा अध्यक्ष राहिल व त्याचे अनुपस्थितीत सभेस हजर असलेल्या सदस्यांनी त्यांचेमधून अध्यक्षपदासाठी अधिकारी निवडणेचा आहे.

(5) प्राधिकरणाच्या सभेमधील निर्णय, जर गरज असेल तर, हजर असलेल्या सदस्यांच्या केवळ मताधिक्याने अथवा मतदानाने घेणेचा असून अध्यक्ष अथवा त्यांचे जागी अध्यक्षपदी असणारा सदस्य याला दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

(6) प्रत्येक सदस्याला एक मत राहणेचे आहे.

(7) प्राधिकरणाच्या प्रत्येक सभेस लागणारी किमान गणसंख्या पाच राहणेची आहे.

(8) अध्यक्षांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिल्याखेरीज कोणाही व्यक्तीस कोणताही विषय दहा दिवसांची सूचना दिल्याशिवाय सभेपुढे विचारार्थ मांडता येणार नाही.

(9) सभेची सूचना सभासदांना, संदेशवाहकामार्फत किंवा पंजीकृत टपालने, सदस्याच्या शेवटच्या राहत्या वा धंद्याच्या माहित असलेल्या पत्त्यावर, पाठविली जाईल किंवा प्राधिकरणाच्या सचिवाला प्राप्त परिस्थितीत योग्य वाटेल त्या मार्गाने दिली जाईल.

**11. प्राधिकरणाकडून तज्ञ समितीची नियुक्ती व तिचे हक्क**

(1) प्राधिकरण, योग्य वाटेल त्या कारणासाठी, पूर्णत्वाने सदस्यांची वा पूर्णत्वाने इतर लोकांची वा काही सदस्य व काही इतर लोक यांची मिळून, अशा अनेक समित्या नेमू शकते.

(2) प्राधिकरणाचे सदस्यांव्यतिरिक्त इतर लोकांचा समावेश असलेल्या समितीच्या सदस्यांना सभेस हजर राहणेबद्दल प्राधिकरणास योग्य वाटेल तितकी फी आणि भत्ते देणेचे आहेत.

**12. प्राधिकरणाची सर्वसाधारण कार्ये**

प्राधिकरण खाली नमूद केलेली कार्ये करू शकते:-

(i) कलम 3, 4 व 6 खालील कार्यक्रम प्रशासित करणेसाठी पध्दत व मार्गदर्शक तत्वे तयार करणे;

(ii) जैविक विविधतेच्या संरक्षणासंबंधी, त्यातील घटकांचे पोषक उपयोगितेबाबत, जैविक संसाधन व त्याचे माहितीच्या उपयोगातून मिळालेल्या नफ्याचे न्याय्य व समभाग प्राप्तीबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे;

(iii) राज्य जैविक विविधता मंडळाचे कार्याबाबत समन्वय साधणे;

(iv) राज्य जैविक विविधता मंडळांना तांत्रिक सहाय्य पुरविणे व मार्गदर्शन करणे;

(v) अभ्यास प्रस्थापन आणि नवशोध व संशोधनास अर्थ सहाय्य;

(vi) प्राधिकरणास त्याची कार्ये परिणामकारकरित्या पार पाडणेसाठी तांत्रिक सहायता मिळणेसाठी तीन वर्षाचे आतील ठराविक काळासाठी सल्लागार नेमणे;
परंतु जर तीन वर्षाचे कालावधीपेक्षा अधिक काळाकरिता सल्लागार नेमणे गरजेचे व आवश्यक असेल तर अशा नियुक्तीसाठी प्राधिकरणाने केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेतली पाहिजे;

(vii) जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत, त्यातील घटकांची पोषक उपयोगिता, जैविक संसाधन व त्याचे ज्ञानाचा उपयोग करून मिळविलेल्या नफ्याचे न्याय्य व समभाग प्राप्तीबाबत तांत्रिक व सांख्यिक माहिती गोळा करणे, संकलीत करणे आणि पुस्तिका, संहिता वा मार्गदर्शके प्रकाशित करणे;

(viii) जैविक विविधतेच्या संरक्षणाबाबत, त्यातील घटकांची पोषक उपयोगिता, जैविक संसाधन आणि त्याचे ज्ञानाचा उपयोग करून मिळविलेल्या नफ्याच्या न्याय्य व समभाग प्राप्तीबाबत लोक प्रसार माध्यमातून बहुसमावेशक कार्यक्रम आयोजित करणे;



(ix) स्वतःची प्राप्ती व केंद्र सरकारतर्फेचे अवमूल्यन यांचा समावेश करून प्राधिकरणाने वार्षिक अंदाजपत्रक तयार करणेचे असून केंद्र सरकारने केलेली विभागणी, केंद्र सरकारने मान्य केलेल्या अंदाजपत्रकातील तरतूदीप्रमाणे कार्यवाहीत आणणेची आहे;

(x) प्राधिकरणाच्या कार्याच्या प्रभावी कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पदे निर्माण करणेची शिफारस करणे व अशी पदे तयार करणे; परंतु अशी कायम स्वरुपी / तात्पुरती वा कोणत्याही स्वरुपाची पदे केंद्र सरकारच्या पूर्व परवानगी शिवाय निर्माण करता येणार नाहीत;

(xi) प्राधिकरणाचे अधिकारी व नोकर यांच्या भरतीबद्दलची पध्दत संमत करणे;

(xii) जैविक संसाधन आणि त्याचेसंबंधी पारंपारिक ज्ञानाबाबत जैविक विविधता नोंदवही द्वारे माहिती व दस्तऐवज पध्दती तयार करणेसाठी आणि माहिती संच उभारण्यासाठी योग्य ती पाउले उचलणे;

(xiii) या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य जैविक विविधता मंडळ आणि जैविक विविधता व्यवस्थापन समित्या यांना लेखी सूचना देणे;

(xiv) या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत व प्राधिकरणाचे कार्याबाबत केंद्र सरकारला अहवाल देणे;

(xv) वेळोवेळी कलम 6 पोटकलम (1) प्रमाणे नफा प्राप्तीची फी गोळा करणेबाबत, जैविक संसाधनाबाबत, कलम 19 पोटकलम (2) खालील स्वामित्वाच्या रकमेच्या बदलाबाबत शिफारसी व दुरूस्ती करणे;

(xvi) राज्य जैविक विविधता मंडळ आणि जैविक विविधता व्यवस्थापन समित्या यांना विशिष्ठ उद्दीष्टांसाठी अनुदान सहाय्य आणि अनुदान मंजूर करणे;

(xviii) या कायद्याच्या अंमलबजावणीचे दृष्टीने कोणत्याही क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करणे;

(xix) भारतातून बेकायदेशीरमार्गे मिळविलेल्या कोणत्याही जैविक संसाधन आणि त्या संबंधीची माहिती बाबतचा बौध्दिक मालमत्ता हक्क भारताबाहेर कोणत्याही देशात दिला जाणेस विरोध करणेसाठी, तज्ञ कायदेशीर सल्लागाराच्या नेमणूकीसह, जरूर ती उपाययोजना करणे;

(xx) केंद्र सरकारने वेळोवेळी सोपविले प्रमाणे वा सूचना दिले प्रमाणे इतर सर्व कार्ये करणे.

13. अध्यक्षांचे अधिकार आणि कर्तव्ये

(1) अध्यक्षाला प्राधिकरणाच्या दैनंदिन घडामोडीवर नियंत्रण ठेवणेचा सर्वंकष अधिकार आहे.

(2) कलम 10 चे तरतूदीस पात्र राहून प्राधिकरणाच्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांवर सर्वसाधारण देखरेख करणेचा अधिकार अध्यक्षास आहे आणि तो प्राधिकरणाचे कार्याचे संचालन आणि व्यवस्थापन यासाठी जरुर ते आदेश देऊ शकतो.

(3) अध्यक्षाचे ताब्यात प्राधिकरणाची सर्व गोपनीय कागदपत्रे व दस्तऐवज असतील व त्यांच्या सुरक्षिततेसाठी तो जबाबदार असेल.

(4) प्राधिकरणाने दिलेल्या सर्व हुकूमांवर व सूचनांवर अध्यक्षांची अथवा अध्यक्षांनी त्यांचे वतीने त्यासाठी नियुक्त केलेल्या, इतर कोणाही अधिका-याची सही असेल.

(5) अध्यक्ष स्वतः अगर याकरिता अधिकार दिलेल्या प्राधिकरणाचे अधिका-या मार्फत, मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे सर्व रकमा मंजूर करू शकतो अथवा वितरित करू शकतो.

(6) अध्यक्षास सर्व अंदाजीय बाबींना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणेचे पूर्ण अधिकार आहेत.

(7) अध्यक्षाने सर्व सभा बोलाविणे व त्यांचे अध्यक्षपद भूषविणेचे आहे आणि प्राधिकरणाने घेतलेल्या सर्व निर्णयांची योग्य त्या पध्दतीने अंमलबजावणी होत असलेबद्दलची खात्री करणेची आहे.

(8) अध्यक्षाने, प्राधिकरणाने अथवा केंद्र सरकारने त्यास वेळोवेळी प्रदान केलेल्या इतर अधिकारांचा वापर करणेचा आहे व इतर कार्ये करणेची आहेत.

14. जैविक संसाधन व त्याबाबतचे पारंपारिक ज्ञान मिळविणेची पध्दती

(1) माहिती गोळा करून, अर्ज निर्णित करणेचा आहे. संशोधन व वाणिज्य उपयोगासाठी, जैविक संसाधन वा त्याबद्दलची माहिती मिळविणेसाठी प्राधिकरणाची संमति मागणा-या कोणाही व्यक्तीने नमूना I मध्ये अर्ज करणेचा आहे.

(2) पोटनियम (1) खाली केलेल्या प्रत्येक अर्जासोबत फीसाठी प्राधिकरणाचे नावे काढलेला, रक्कम रुपये दहा हजारचा धनादेश वा मागणीपत्र (D.D.) जोडणेचे आहे.

(3) प्राधिकरणाने अर्ज प्राप्त झालेपासून, शक्यतो सहा महिन्याचे आत, संबंधित स्थानिक संस्थांशी सल्लामसलत करून अर्जदाराकडून व इतर स्रोतांकडून त्याबाबतची जरुर वाटेल ती माहिती गोळा करुन अर्ज निर्णित करणेचा आहे.



(4) अर्जाच्या गुणवत्तेबाबत समाधान झालेस प्राधिकरण योग्य त्या अटीस व शर्तीस पात्र राहून जैविक संसाधन वा त्या संबंधिची माहिती मिळविणेस संमति देऊ शकते.

(5) ही संमति प्राधिकरणाचा अधिकृत अधिकारी व अर्जदार यांच्या सह्या असलेल्या लेखी कराराचे स्वरुपात देणेची आहे.

(6) पोटनियम (5) मध्ये संदर्भित केलेला कराराचा नमूना प्राधिकरणाने तयार करणेचा आहे आणि त्यात खालील गोष्टींचा स्समावेश असला पाहिजे; अनुक्रमेः-

(i) परवानगी मागणा-या अर्जातील सर्वसाधारण उद्दीष्टे व हेतू;

(ii) जैविक संसघन आणि पारंपारिक ज्ञान, संलग्न माहितीसह, याचे वर्णन;

(iii) जैविक संसधनाचे नियोजित उपयोग (संशोधन,संकर,वाणिज्य इत्यादि);

(iv) ज्याखाली अर्जदार बौध्दिक मालमत्ता हक्क मागू शकेल त्या अटी;

(v) आर्थिक आणि इतर अनुशंगिक फायद्यांचे परिमाण. विशेषतः जर जैविक साहित्य संशोधनासाठी घेऊन नंतर त्याचे वाणिज्य उपयोगासाठी वापर केलेस आणि नंतर त्याचे वापरात कोणताही बदल केलेस, जर गरज असेल तर, नवीन करार करून देणेबद्दलची वचनबध्दता;

(vi) मिळविलेले जैविक संसाधन आणि पारंपारिक ज्ञान प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय ति-हाईत व्यक्तीस हस्तांतर करणेस बंदी;

(vii) अर्जदाराने ज्या जैविक संसाधनाबाबत अर्ज केला असेल त्याच्या परिनाण व गुणवत्ते बाबत तपशीलासंबंधी प्राधिकरणाने घातलेल्या मर्यादांना चिकटून राहणे;

(viii) जे जैविक साहित्य मिळविणेचे आहे त्याचा संदर्भित नमूना कलम 39 मध्ये नमूद केलेल्या संग्रहालयात ठेवणेबद्दलची हमी;

(ix) प्राधिकरणाला संशोधनाबाबत आणि इतर विकासाबाबत नियमित स्थितिक अहवाल देणे;

(x) या कायद्यातील तरतूदी व नियम आणि देशातील तत्संबंधी अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यांचे पालन करणेबाबतची वचनबध्दता;

(xi) मिळविलेल्या जैविक संसाधनाचे संरक्षण व पोषक उपयोग याबद्दलच्या उपाययोजनेस गती देणेबद्दल वचनबध्दता;

(xii) गोळा करणेच्या कृतीचा पर्यावरणावर होणारा परिणाम न्यूनतम करणेसाठी वचनबद्दता

(iii) कायदेशीर तरतूदी, उदा. कराराचा कालावधी, करार रद्द करणेबाबतची सूचना, प्रत्येक कलमाची स्वतंत्रपणे अंमलबजावणी पात्रता, करार रद्द झाले नंतरही नफा प्राप्तीबद्दलचे कलम अस्तित्वात राहणेच्या बांधिलकीची तरतूद, जबाबदारी मर्यादित करणा-या घटना (नैसर्गिक आपत्ती), लवाद, कोणतेही गोपनीयता कलम.

(7) जे जैविक संसाधन मिळविण्याबाबत परवानगी दिली आहे त्याच्या अटी, विशेषतः संरक्षणाबाबत व सुरक्षिततेबाबत उपाययोजना करणा-या असाव्यात.

(8) प्राधिकरण, विनंती मान्य करणे योग्य वाटत नसेल तर त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करून अर्ज नाकारू शकते.

(9) अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडणेची योग्य ती संधी दिलेशिवाय अर्ज नामंजूर करता येणार नाही.

(10) दिलेल्या मान्यतेस मुद्रणा मार्फत वा इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी मिळावी म्हणून प्राधिकरणाने पाउले उचलणेची आहेत व ज्या अटीवर मंजूरी दिली आहे त्या अटींचे पालनाबाबत ठराविक कालानंतर देखरेख करणेची आहे.

15. **प्रवेशास नामंजूरी किंवा मंजूरी**

(1) प्राधिकरण खालील अटीवर, एखाद्या तक्रारीचे आधारे वा स्वतः होऊन कलम 15 खाली प्रवेश मिळविणेबाबतची मंजूरी खालील अटींवर काढून घेऊ शकते आणि लेखी करार नाकारू शकते, अनुक्रमेः-

(i) ज्या व्यक्तीस परवानगी दिली आहे तिने या कायद्यातील तरतूदींचा अथवा ज्या अटींवर मंजूरी दिली आहे त्या अटींचा भंग केला आहे असा वाजवी विश्वास असेल तर;

(ii) ज्या व्यक्तीस परवानगी दिली आहे तिने करारातील अटींची पूर्तता केली नाही तर;

(iii) ज्या अटींवर प्रवेशास मंजूरी दिली आहे त्यातील एखाद्या अटीची पूर्तता केली नाही तर;

(iv) सार्वजनिक हित किंवा पर्यावरणाचे संरक्षण आणि जैविक विविधतेचे संरक्षण डावलले तर.

(2) प्रवेशास प्रतिबंध करणेसाठी, काही नुकसान झाले असेल तर त्याचे मूल्यमापन करणेसाठी आणि नुकसान वसूलीसाठी योग्य ती पाऊले उचलणेसाठी प्राधिकरणाने त्याच्या प्रत्येक नकाराच्या हुकूमाची प्रत संबंधित राज्य जैविक विविधता मंडळास व जैविक विविधता व्यवस्थापन समितीस पाठविणेची आहे.

16. **जैविक संसाधनाप्रति प्रवेश मिळविणेच्या कार्यास निर्बंध**

(1) प्राधिकरण खालील कारणासाठी गरजेचे व योग्य वाटलेस जैविक संसाधन मिळविणे बाबतच्या विनंतीस निर्बंध करू शकते; अनुक्रमेः-



(i) प्रवेशाबाबत मागितलेली परवानगी ही धोक्यात असलेल्या जातीबद्दल असेल तर;

(i) प्रवेशाबाबत मागितलेली परवानगी ही स्थानिक वा दुर्मिळ प्रजातीबद्दल असेल तर;

(iii) प्रवेशासाठी मागितलेल्या परवानगीमुळे स्थानिक लोकांच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम होणार असेल तर;

(iv) प्रवेशाच्या परवानगीमुळे पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होणार असून तो नियंत्रित करणे वा सौम्य करणे अवघड असेल तर;

(v) प्रवेशाच्या परवानगीमुळे जनुकी क्षरण होऊन परिसंस्थेच्या कार्यावर विपरित परिणाम होणार असेल तर;

(vi) राष्ट्रीय हिताच्या आणि इतर तत्संबंधी, भारताने केलेल्या अंतरराष्ट्रीय करारांच्या उद्दीष्टांचे विरूध्द संसाधनाचा उपयोग होत असेल तर.

17. **संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरण करणेसाठी घ्याव्या लागणा-या परवानगीची पध्दत**

(1) कोणीही व्यक्ती, भारतातून मिळविलेल्या जैविक संसाधना बाबतच्या शोधातून मिळालेले निष्कर्ष परदेशी व्यक्ती, कंपनी आणि अनिवासी भारतीय (NRIs) यांना आर्थिक मोबदल्यासाठी हस्तांतरण करणेस इच्छूक असेल तर तिने प्राधिकरणाला नमूना II मध्ये नमूद केलेप्रमाणे अर्ज करणेचा आहे.

(2) उपनियम (1) मधील प्रत्येक अर्जासोबत प्राधिकरणाचे नावे काढलेले रक्कम रुपये पाच हजारचे मागणीपत्र वा धनादेश जोडला पाहिजे.

(3) उपनियम (1) मधील अर्ज, प्राप्त झालेपासून प्राधिकरणाने तो शक्यतो तीन महिन्याचे आत निर्णीत करणेचा आहे.

(4) अर्जदारेने सर्व जरूर त्या गोष्टींची पूर्तता केलेबद्दल समाधान झालेस, प्राधिकरणाने, त्यासाठी ज्या अटी व शर्ती लादणे योग्य आहे असे वाटेल त्या अटी व शर्तीस पात्र राहून संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरणास परवानगी देणेची आहे.

(5) हस्तांतरणास देणेत येणारी मान्यता, प्राधिकरणाचा अधिकृत अधिकारी व अर्जदार यांच्या सह्या असलेल्या लेखी कराराने देणेची आहे. प्राधिकरण निश्चित करेल त्या नमून्यात करार करणेचा आहे.

(6) अर्ज मंजुर करता येणार नाही असे वाटलेस प्राधिकरण त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून अर्ज नाकारू शकते;

परंतु अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडणेची योग्य ती संधी दिले शिवाय अर्ज नाकारता येणार नाही.

18. बौध्दिक मालमत्तेच्या रक्षणासाठी अर्ज करण्याआधी घ्यावयाच्या पूर्व परवानगीची पध्दत

(1) जैविक साधनावरील संशोधन व भारतातून मिळविलेले ज्ञान या आधरे पेटंट वा इतर बौध्दिक मालमत्तेबाबत अर्ज करू इच्छिणा-या कोणाही व्यक्तीने नमूना III प्रमाणे अर्ज करणेचा आहे.

(2) पोटनियम (1) खालील अर्जासोबत रुपये पाचशे ची फी भरणेची आहे.

(3) प्राधिकरणाने सदर अर्जाचे मूल्यांकन करून व त्या बाबतची अधिकची माहिती मिळवून गुणवत्तेनुसार अर्ज प्राप्त झालेपासून शक्यतो तीन महिन्याचे आत सदर अर्जाचा निर्णय करणेच आहे.

(4) अर्जदाराने जरूर त्या सर्व गोष्टींची पूर्तता केलेबद्दल समाधान झालेस प्राधिकरण, योग्य वाटेल त्या अटी व शर्ती लादून, पेटंटबाबत वा अन्य बौध्दिक मालमत्ते बाबत अर्ज करणेस परवानगी देऊ शकते.

(5) सदरची मंजूरी ही अर्जदार व प्राधिकरणाचा अधिकृत अधिकारी यांचे सह्यांचे लेखी कराराने देणेची आहे. सदर कराराचा नमूना प्राधिकरण ठरवू शकते.

(6) सदरची विनंती मान्य करता येत नाही असे वाटलेस, प्राधिकरण सदरचा अर्ज लेखी कारणे नमूद करून नामंजूर करू शकते. नकाराबाबतचा हुकूम करणेपूर्वी अर्जदारास त्याचे म्हणणे मांडणेची संधी देणेची आहे.

19. कलम 20 पोटकलम (2) खाली तिस-या पक्षकारास हस्तांतरण करणेची पध्दत

(1) जैविक संसाधन व अनुशंगिक ज्ञान मिळविणेसाठी ज्या व्यक्तींना मंजूरी दिली आहे अशा व्यक्तीस, मिळविलेले जैविक संसाधन वा ज्ञान ति-हाईत व्यक्तीस अथवा संघटनेस हस्तांतरण करणेची इच्छा असलेस तिने प्राधिकरणास नमूना IV प्रमाणे अर्ज करणेचा आहे.

(2) पोटनियम (1) खालील प्रत्येक अर्जासोबत फी म्हणून प्राधिकरणाचे नावे काढलेले रुपये दहा हजारचे मागणीपत्र किंवा धनादेश जोडला पाहिजे.

(3) प्राधिकरणाने अर्जाचे मूल्यांकन करून व अधिकची माहिती मिळवून अर्ज प्राप्त झालेपासून शक्यतो सहा महिन्याचे आत सदर अर्ज निर्णित करणेचा आहे.

(4) अर्जदाराने जरूर त्या सर्व गोष्टींची पूर्तता केलेबद्दल समाधान झालेस प्राधिकरण, योग्य वाटेल त्या अटी व शर्ती लादून, तिस-या पक्षकाराला हस्तांतर करणेच अर्ज मंजूर करू शकते.

(5) पोटनियम (4) खाली देणेची मंजूरी ही अर्जदार व प्राधिकरणाचा अधिकृत अधिकारी यांचे सह्यांचे लेखी कराराने देणेची आहे. प्राधिकरण ठरवेल त्या नमून्यात करार करणेचा आहे.



(6) अर्ज मंजूर करता येणार नाही असे वाटलेस प्राधिकरण त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून अर्ज नाकारू शकते, परंतु अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडणेची योग्य ती संधी दिले शिवाय अर्ज नाकारता येणार नाही.

20. नफ़्याचे सममाग विभाजनाचे निकष (कलम 21)

(1) प्राधिकरण अधिकृत राजपत्रात अधिसूचित करून मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करू शकते.

(2) मार्गदर्शक तत्वांमुळे आर्थिक आणि इतर लाभ मिळतील ; जसे, स्वामित्वाची रक्कम, संयुक्त साहस, तंत्र हस्तांतरण, उत्पादन विकास, शिक्षण, जागरुकता निर्माण करणारे कार्यक्रम, संस्थांतर्गत क्षमता निर्मिति, जोखिम भांडवल निधी.

(3) नफ़ा विभाजनाचे सूत्र प्रत्येक वस्तुस्थितीवर आधारित ठरविले जाईल.

(4) जैविक संसाधन आणि अनुशंगिक ज्ञान मिळविणेसाठी, त्यापासूनचे संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरित करणेसाठी, पेटंट अथवा बौध्दिक मालमत्ते बाबत वा तिस-या पक्षकारास मिळविलेले जैविक संसाधन व तत्संबंधीचे ज्ञानाचे हस्तांतरण यासाठीच्या कोणाच्याही अर्जास मंजूरी देतांना प्राधिकरण, अशा मिळविलेल्या जैविक संसाधन व तत्संबंधीचे ज्ञानाचे उपयोगातून मिळणा-या नफ़्याच्या समभाग विभाजनाचे खात्रीसाठी अट व शर्ती लादू शकते.

(5) स्थानिक संस्था व नफ़्याचे हिस्सेदारांशी सल्लामसलत करून, मंजूरीसाठी अर्ज करणारी व्यक्ती व प्राधिकरण नफ़्याचे परिमाणाबाबत उभय पक्षास मान्य असा करार करणेचा असून तो ठरवितांना, प्रवेशाबाबतचे निश्चित केलेले मानदंड, वापराच्या मर्यादा, पोषक उपयोगाचा दृष्टीकोन, प्रभाव आणि अपेक्षित निष्कर्ष स्तर, ज्यामध्ये जैविक विविधतेचे संरक्षण व पोषक उपयोग यांची खात्री देणारी उपाययोजना याचा योग्य विचार करणेचा आहे.

(6) प्राधिकरणाने प्रत्येक मामल्यावर आधारित लघु, मध्यम व दीर्घ मुदतीच्या नफ़ा विभाजनाचे मूल्यांकनासाठी समय सूची निश्चित करणेची आहे.

(7) नफ़ा हा जैविक विविधतेच्या संरक्षणाची व पोषक उपयोगितेची खात्री देणारा असला पाहिजे अशी अट प्राधिकरण घालू शकते.

(8) जेथे जैविक संसाधन अथवा ज्ञान विशिष्ठ व्यक्तीकडून वा व्यक्तीसमूहाकडून वा संस्थेकडून प्राप्त केले असेल तेव्हा प्राधिकरण जिल्हा व्यवस्थापनाकडून थेट त्यांनाच रक्कम मिळणेची खात्री देणेसाठी पाऊले उचलू शकते. जेव्हा अशा व्यक्ती, व्यक्तीसमूह अथवा संस्था नक्की होऊ शकत नसतील तेव्हा आर्थिक नफ़ा हा राष्ट्रीय जैविक विविधता निधीमध्ये ठेवणेचा आहे.

(9) निर्धारित नफ़्यापैकी पाच टक्के रक्कम प्राधिकरणाचे अथवा मंडळाचे, यथास्थिति, व्यवस्थापकीय व सेवा प्रभारासाठी काढून ठेवणेची आहे.

(10) पोटनियम (4) खाली निर्धारित नफ्याचे प्रवाहावर निर्धारित केलेल्या पध्दतीने प्राधिकरणाने लक्ष ठेवणेचे आहे.

21. जैविक विविधता निधीचा वापर

(1) अध्यक्षाने अथवा याबाबतीतील प्राधिकरणाच्या अधिकृत अधिका-याने राष्ट्रीय जैविक विविधता निधी चालविणेचा आहे.

(2) राष्ट्रीय जैविक विविधता निधीस लेखासाठी दोन स्वतंत्र शीर्षके असतील, एक केंद्र सरकारकडून होणा-या प्राप्तीबाबत व दुसरे फी, परवाना फी, स्वामित्व व प्राधिकरणाची इतर प्राप्तीसाठी.

22. जैविक विविधता व्यवस्थापन समिती

(1) प्रत्येक स्थानिक संस्थेने तिच्या अधिकारातील क्षेत्रात जैविक विविधता व्यवस्थापन समिती (BMCs) तयार करणेची आहे.

(2) पोटनियम (1) खाली तयार करणेत आलेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व स्थानिक संस्थेने नामनिर्देशन केलेले जास्तीत जास्त सहा लोक, ज्यामध्ये कमीत कमी 1/3 महिला व कमीत कमी 18% मागासवर्गीय जाती/ जमातीचे लोक यांचा समावेश असणेचा आहे.

(3) जैविक विविधता व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष हा स्थानिक संस्थेच्या अध्यक्षांनी अध्यक्षित केलेल्या सभेत समितीच्या सदस्यांमधून निवडणूकीने घेणेचा आहे. बरोबरी झाल्यास स्थानिक संस्थेच्या अध्यक्षास निर्णायक मताचा अधिकार राहील.

(4) जैविक विविधता व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाचा कालावधी तीन वर्षांचा राहील.

(5) समितीच्या सभेला विधी मंडळाचे / विधान परिषदेचे सभासदापैकी स्थानिक सभासद व लोकसभेचे सभासद विशेष आमंत्रित असतील.

(6) जैविक विविधता व्यवस्थापन समितीचे मुख्य कार्य म्हणजे स्थानिक लोकांशी चर्चा करून लोक जैव विविधता नोंदवही तयार करणे हे होय. नोंदवही मध्ये स्थानिक जैविक संसाधनाचे ज्ञान व उपलब्धता, त्यांचे औषधी व इतर उपयोग व त्या संबंधीचे पारंपारिक ज्ञान याबाबत व्यापक माहिती अंतर्भूत असली पाहिजे.

(7) जैविक विविधता व्यवस्थापन समितीची इतर कार्ये म्हणजे राज्य जैविक विविधता मंडाळाने अथवा प्राधिकरणाने त्यांचेकडे मंजूरीसाठी पाठविलेल्या विषयाबाबत सल्ला देणे, स्थानिक वैद्य, जैविक संसाधनाचा वापर करणारे व्यावसायिक यांची आकडेवारी ठेवणे.

(8) लोक जैव विविधता नोंदवहीचा नमूना निश्चित करणे आणि त्यात समाविष्ट असणा-या बाबींचा तपशिल व इलेक्ट्रॉनिक माहिती संचाचा नमूना तयार करणे यासाठी पाऊले उचलणेची आहेत.



(9) लोक जैव विविधता नोंदवही तयार करण्यासाठी जैविक विविधता व्यवस्थापन समितीस प्राधिकरण आणि राज्य जैविक विविधता मंडळ यांनी मार्गदर्शन व तांत्रिक सहाय्य देणेचे आहे.

(10) लोक जैव विविधता नोंदवही ही जैविक विविधता व्यवस्थापन समितीने ठेवणेची आहे आणि कायदेशीर करणेची आहे.

(11) जैविक संसाधनाच्या प्रवेशाचा, मिळालेल्या पारंपारिक ज्ञानाचा तपशिल,लादलेल्या फीचा तपशिल,मिळाविलेल्या नफ्याचा तपशिल व विभाजनाची पध्दत याबाबत माहिती देणारी नोंदवही सुध्दा समितीने ठेवणेची आहे.

23. कलम 50 खालील वादांचा निर्णय करणेसाठी अपील

(1) जर प्राधिकरण व राज्य जैविक विविधता मंडळ यांचेमध्ये अथवा एक मंडळ व दुसरे मंडळ यांचेमध्ये एखाद्या हुकूमाची अथवा आदेशांची किंवा धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणे बाबत वाद निर्माण झालेस, व्यथित पक्षकार, म्हणजे यथास्थिति प्राधिकरण अथवा मंडळ,कलम 50 खाली केंद्र सरकारकडे, नमूना V प्रमाणे भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या सचिवाकडे अपील करू शकतो.

(2) जर एक राज्य जैविक विविधता मंडळ व दुसरे राज्य जैविक विविधता मंडळ अथवा मंडळे, यांचे दरम्यान वाद निर्माण झालेस,व्यथित मंडळ अथवा मंडळे यांनी वादाचा मुद्दा अथवा मुद्दे केंद्र सरकारकडे पाठविणेचे असून केंद्र सरकारने ते प्राधिकरणाकडे पाठविणेचे आहेत.

(3) अपीलाचे निवेदनात त्या घटनेची हकिकत, अपील करणेसाठी आधारभूत असलेले मुद्दे आणि केलेली मागणी नमूद केली पाहिजे.

(4) अपीलाचे निवेदनासोबत, अपीलकार ज्या हुकूमाने, सूचनेने अथवा धोरणात्मक निर्णयाने, यथास्थिति, व्यथित झाला त्याची अधिकृत प्रत हजर केली पाहिजे आणि अपीलावर अपीलकाराच्या अधिकृत प्रतिनिधीने सही केली असली पाहीजे.

(5) अपीलाचे निवेदन हे विवादित हुकूम, सूचना व धोरणात्मक निर्णयापासून तीस दिवसाचे आत चार प्रतींमध्ये करणेचे असून ते व्यक्तीशः वा परत पावतीच्या टपालाने पाठविणेचे आहे. सदरचे अपील दाखल करणेस झालेला उशीर योग्य व सबळ कारणामुळे झाला असलेबद्दल केंद्र सरकारचे समाधान झालेस ते, त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करून तीस दिवसानंतर केलेले परंतु विवादित हुकूमाचे धोरणात्मक निर्णयाचे तारखेपासून, यथास्थिति, ७५ दिवसाचे आत केलेले अपील दाखल करणेस परवानगी देऊ शकते.

(5) अपीलाचे चौकशीची सूचना नमूना VI प्रमाणे परत पावतीच्या टपालाने पाठविणेची आहे.

(6) केंद्र सरकारने अपीलकार व इतर पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेऊन अपील निकाली काढणेचे आहे.

(7) अपील निर्णीत करतांना विवादित हुकूम, सूचना, धोरण, यथास्थिति, बदलणेचा वा दुरुस्त करणेचा वा रद्द करणेचा आहे.

(8) विवादाचा न्यायनिर्णय करतांना प्राधिकरणाने नैसर्गिक न्याय तत्वांचे पालन करणेचे असून, केंद्र सरकारला या नियमाखाली अंमलात आणावी लागणारी पध्दत यथाशक्ती अवलंबणेची आहे.

24. **कलम 61 खाली द्याव्या लागणा-या सूचनेची पध्दत**

(1) कलम 61 उपकलम (ब) खाली द्याव्या लागणा-या सूचनेची पध्दत खालील प्रमाणे असेलः-

(i) सूचना लेखी असून नमूना VII प्रमाणे असावी

(ii) सूचना पाठविणा-या व्यक्तीने ती खालील प्रमाणे पाठवावी-

(अ) जर तथाकथित गुन्हा हा केंद्रशासित प्रदेशात घडला असेल तर राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाचे अध्यक्षास; आणि

(ब) जर तथाकथित गुन्हा हा राज्यात घडला असेल तर त्या राज्याच्या राज्य जैविक विविधता मंडळाचे अध्यक्षास.

(2) पोटनियम (1) मध्ये नमूद केलेली सूचना ही परत पावतीचे पंजीकृत टपालाने पाठवावी; आणि

(3) पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकरणास सूचना प्राप्त झाले तारखेपासून कलम ६१ उपकलम (ब) मध्ये नमूद केलेला तीस दिवसांचा कालावधी मोजणेचा आहे.



# नमूना I

## (नियम 14 पहा)

## जैविक संसाधन व तत्संबंधी पारंपारिक ज्ञान याच्या प्राप्तीसाठीचा अर्ज

### भाग अ

1. अर्जदाराचा पूर्ण तपशिल

i. नाव :

ii. कायमचा पत्ता :

iii. भारतातील संपर्क व्यक्ती / एजंट असल्यास :

iv. संस्थेची इतंभूत माहिती (अर्जदार एक व्याक्ती असेल तर व्यक्तीची माहिती, कृपया सत्यतेबद्दलची योग्य कागदपत्रे जोडावित ) :

v. कामाचे स्वरुप :

vi. संस्थेची आर्थिक उलाढाल, US, $ मध्ये :

2. प्राप्तीचे स्वरुप व जैविक साधन व तत्संबंधीचे ज्ञान याबाबतची प्राप्ती संदर्भात विशेष माहिती व तपशिल

अ) जैविक संसाधनाचे शास्त्रीय नाव आणि पारंपारिक उपयोग :

ब) जेथून साधन प्राप्त करणेचे आहे ते भौगोलीक स्थान :

क) पारंपारिक ज्ञानाचे वर्णन व स्वरुप (तोंडी / नोंदविलेले ) :

ड) एखादी माहित झालेली व्यक्ति / समाज की जीच्याजवळ पारंपारिक ज्ञान आहे :

इ) गोळा करावयाच्या जैविक संसाधनाचे परिंमाण (वेळापत्रक देणे ) :

फ) जैविक संसाधन गोळा करणेचे नियोजिले आहे तो कालावधी :

ग) चयन करणेसाठी कंपनीव्दारा अधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव व संख्या :

ह) ज्यासाठी प्रवेश मागितला आहे ते प्रयोजन, ज्यामध्ये संशोधनाचा प्रकार व मर्यादा, त्यापासून मिळणारा व अपेक्षित वाणिज्य उपयोग समाविष्ट आहे :

ई) संसाधन प्राप्तीमुळे जैविक संसाधनाचा एखादा घटक धोक्यात येतो का व प्रवेशानुळे संभाव्य धोकेः

3. संशोधन व विकासाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होणा-या एखाद्या राष्ट्रीय संस्थेचा तपशिलः

4. प्राप्त संसाधनाचे प्राथमिक गंतव्य स्थान व जेथे संशोधन व विकास केला जाणार आहे ते ठिकाणः

5. आर्थिक व इतर फ़ायदे ज्यामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव आहे, बौध्दिक मालमत्ता हक्कातून मिळणारे, प्राप्त जैविक संसाधन व ज्ञान यातून अपेक्षित किंवा अर्जदाराकडे वा तो /ती ज्या देशातील आहेत त्याचेकडे सहजी चालून येणारेः

6. अर्जदारास अथवा तो / ती जेथील रहिवासी आहेत त्या देशाला जैवतंत्रज्ञानिक, वैज्ञानिक, समाजशास्त्रीय वा इतर कोणतेही फायदे प्राप्त जैविक संसाधन व ज्ञान यापासून मिळत असतील किंवा चालून येणारे असतील तर ते:

7. प्राप्त जैवसंसाधन व त्याचे ज्ञान यातून निर्माण होणा-या फायद्याच्या भारताकडे / समाजाकडे येणा-या हिश्श्याचा अंदाजः

8. नफ्याचे विभाजनाची नियोजित कार्यपद्धती व आखणीः

9. इतर प्रसंगोचित माहिती.

भाग ब

उद्घोषण

मी / आम्ही घोषित करितो कीः

- नियोजित जैविक संसाधनाचे प्राप्तीमुळे संसाधनाच्या पोषक उपयोगितेवर विपरित परिणाम होणार नाही;
- नियोजित जैविक संसाधन गोळा करण्यामुळे पर्यावरणावर कोणताही परिणाम लादला जाणार नाही;
- जैविक संसाधन गोळा करण्यामुळे परिसंस्थेला कोणत्याही प्रकारचा धोका असणार नाही;
- जैविक संसाधन गोळा करण्यामुळे स्थानिक समाजावर कोणताही विपरित परिणाम होणार नाही;

मी / आम्ही असेही घोषित करतो की या अर्जात पुरविलेली माहिती सत्य व बरोबर आहे आणि कोणत्याही असत्य/ चुकीच्या माहितीस मी / आम्ही जबाबदार आहे / आहोत.

सही

नाव

पद

ठिकाणः

दिनांकः



## नमूना II

(नियम १७ पहा)

## वाणिज्य उपयोगाकरिता संशोधनाचे निष्कर्ष परदेशी व्यक्ती, संस्था, अनिवासी भारतीय यांना हस्तांतरीत करणेसाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाकडून घेणेच्या पूर्व परवानगीचा अर्ज

1. अर्जदाराची संपूर्ण माहिती
   - i) नाव :
   - ii) पत्ता :
   - iii) व्यावसायिक विवरणः
   - iv) संस्थेशी संलग्नता (पुराव्यासाठी योग्य कागदपत्रे जोडावित) :
2. संशोधनातून मिळालेल्या निष्कर्षाचा तपशिलः
3. संशोधनामध्ये वापरलेल्या जैविक संसाधनाचा आणि / अथवा तत्संबंधी ज्ञानाचा तपशिलः
4. संशोधनासाठी वापरलेले जैविक संसाधन जेथून प्राप्त झाले ते भौगोलिक स्थानः
5. संशोधनामध्ये वापरण्यात आलेल्या पारंपारिक ज्ञानाचा व एखादी व्यक्ति/समाज ज्याच्याजवळ पारंपारिक ज्ञान असल्याचे दिसून आले आहे त्याचा तपशिलः
6. ज्या संस्थेमध्ये संशोधन व विकासाचे संदर्भातील काम केले तिचा तपशिलः
7. ज्या व्यक्ती / संस्थेला संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरीत करणेचे आहेत तिचा तपशिलः
8. हस्तांतरीत संशोधन निष्कर्षाचे वाणीज्यीकरण केल्याने व्यक्ति / संस्थेला होणारे किंवा चालून येणारे आर्थिक, जैवतंत्रज्ञानिक, शास्त्रीय अथवा अन्य कोणतेही फायदे जे अपेक्षित आहेत, त्याचा तपशिलः
9. संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरीत करणेची परवानगी मागणा-या अर्जदाराला मिळणारे वा चालून येणारे आर्थिक,जैवतंत्रज्ञानिक, शास्त्रीय अथवा अन्य कोणतेही फायदे जे अपेक्षित आहेत, त्याचा तपशिलः
10. संशोधनाचे निष्कर्ष हस्तांतरीत करणेची परवानगी मागणांरा अर्जदार व प्राप्तकर्ता यांचेमध्ये झालेला करार वा सद्भावकरार याचा तपशिलः

उद्घोषण

मी / आम्ही घोषित करतो की या अर्जात पुरविलेली माहिती सत्य व बरोबर आहे आणि कोणत्याही असत्य/ चुकीच्या माहितीस मी / आम्ही जबाबदार आहे / आहोत.

सही

नाव

पद

ठिकाणः

दिनांकः

## नमूना III
## (नियम 18 पहा)
## बौध्दिक मालमत्ता हक्कासाठी अर्ज करणेसाठी जैविक विविधता प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीसाठीचा अर्ज

1. अर्जदाराची संपूर्ण माहिती
   (i) नाव :
   (ii) पत्ता :
   (iii) व्यावसायिक विवरणः
   (iv) संस्थेशी संलग्नता (पुराव्यासाठी योग्य कागदपत्रे जोडावित) :
2. ज्या शोधासाठी बौध्दिक मालमत्ता स्वामित्व (IPRs) मिळविले आहे त्याचा तपशिलः
3. शोधामध्ये वापरलेल्या जैविक संसाधन आणि /वा तत्संबंधीचे ज्ञान याचा तपशिलः
4. शोधामध्ये वापरलेले जैविक संसाधन जेथून प्राप्त झाले त्याचे भौगोलिक स्थानः
5. शोधामध्ये वापरण्यात आलेल्या पारंपारिक ज्ञानाचा व एखादी व्यक्ति/समाज ज्याच्याजवळ पारंपारिक ज्ञान असल्याचे दिसून आले आहे त्याचा तपशिलः
6. ज्या संस्थेमध्ये संशोधन व विकासाचे संदर्भातील काम केले तिचा तपशिलः
7. शोधाचे वाणीज्यीकरण केल्याने व्यक्ति / संस्थेला होणारे किंवा चालून येणारे आर्थिक, जैवतंत्रज्ञानिक, शास्त्रीय अथवा अन्य कोणतेही फायदे जे अपेक्षित आहेत, त्याचा तपशिलः

### उद्घोषण

मी / आम्ही घोषित करतो की या अर्जात पुरविलेली माहिती सत्य व बरोबर आहे आणि कोणत्याही असत्य/ चुकीच्या माहितीस मी / आम्ही जबाबदार आहे / आहोत.

सही

नाव

पद

ठिकाणः

दिनांकः



## नमूना IV
## (नियम 19 पहा)
## प्राप्त जैविक संसाधन व तत्संबंधी पारंपारिक ज्ञान तृतीय पक्षाला हस्तांतरीत करण्यासाठी राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणाच्या परवानगीसाठीचा अर्ज

1. अर्जदाराची संपूर्ण माहिती
   i) नाव :
   ii) पत्ता :
   iii) व्यावसायिक विवरणः
   iv) संस्थेशी संलग्नता (पुराव्यासाठी योग्य कागदपत्रे जोडावित) :
2. प्राप्त केलेल्या जैविक संसाधन व पारंपारिक ज्ञान याचा तपशिलः
3. प्राप्तीसाठी केलेल्या कराराचा तपशीलः
4. फायदे व अस्तीत्वात असलेली नफ्याच्या विभाजनाची पध्दत / व्यवस्थाः
5. ज्या तृतीय पक्षाला प्राप्त साधन/ज्ञान हस्तांतरीत करणेचे आहे त्याची संपूर्ण माहितीः
6. तृतीयपक्ष हस्तांतरणाचा हेतूः
7. हस्तांतरित साधन व ज्ञान यामुळे तृतीय पक्षाला मिळाणारे वा चालून येणारे आर्थिक, सामाजिक, जैव तंत्रज्ञानिक, शास्त्रीय अथवा अन्य कोणतेही फायदे जे अपेक्षित आहेत, त्याचा तपशिलः
8. अर्जदार व तृतीय पक्ष यांचेमध्ये एखादा करार करणेचा असलेस त्याचा तपशिलः
9. प्राप्त जैविक संसाधन व पारंपारिक ज्ञानाच्या तृतीय पक्ष हस्तांतरणामुळे भारताला / समाजाल मिळणारे फायदेः
10. नियोजित तृतीय पक्ष हस्तांतरणामुळे मिळणा-या नफ्याच्या विभाजनाची कार्यपध्दती व आखणीः
11. इतर संयुक्तिक माहितीः

### उद्घोषण

मी / आम्ही घोषित करतो की या अर्जात पुरविलेली माहिती सत्य व बरोबर आहे आणि कोणत्याही असत्य/ चुकीच्या माहितीस मी / आम्ही जबाबदार आहे / आहोत.

सही

नाव

पद

ठिकाणः

दिनांकः

## नमूना V
## (नियम 23(1) पहा)
## अपीलाच्या निवेदनपत्राचा नमूना
## Form of Memorandum of Appeal

समक्ष __________ पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली

किंवा

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण

(यथास्थिति)

(जैविक विविधता कायदा,२००२ च्या कलम ५० खालील अपीलाचे निवेदनपत्र)

अपील क्र. ________, २०० चे

__________

__________

.........अपीलकार(एक/अनेक)

विरुध्द

__________

__________

..........प्रतिवादी (एक/अनेक)

( या ठिकाणी यथास्थिति, प्राधिकरण/मंडळ याचा उल्लेख करावा)

प्रतिवादींनी खालील वस्तुस्थिति व पार्श्वभूमीवर आधारित जो हुकूम दि.______ ला निर्गित केला आहे त्या विरुध्द हे अपीलाचे निवेदनपत्र अपीलकार सादर करण्याची याचना करीत आहे.

1. वस्तुस्थिति

(येथे थोडक्यात सदर घटनेची वस्तुस्थिति द्यावी)

2. पार्श्वभूमि

(ज्या पार्श्वभूमीवर अपील आधारित आहे ती द्यावी )

i)

ii)

iii)



3. अपेक्षित दिलासा

i)

ii)

iii)

4. प्रार्थना

अ) वरील मुद्यांच्या आधारे अपीलकार आदरपूर्वक प्रार्थना करीत आहे की प्रतिवादीचा सदर हुकूम /निर्णय रद्द/ दुर्लक्षित करावा.

ब) प्रतिवादींनी मांडलेले धोरण/मार्गदर्शन/ नियम हे __________ मर्यादेपर्यंत रद्द / दुरुस्त / रद्दबातल करणेत यावे.

क) __________

अपीलकाराची स्वाक्षरी

ठिकाणः व मोहोर

दिनांकः पत्ताः

### सत्याची प्रमाणितता

मी, अर्जदार जाहीर करीत आहे की उपर्युक्त निवेदन माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे सत्य आहे. प्रमाणित ________ दि. ________ महिना / वर्ष

अपीलकाराची स्वाक्षरी

मोहोर

पत्ता

अपीलकाराच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी

सोबत : 1. हुकूम / मार्गदर्शन / धोरणात्मक निर्णय, ज्याच्या विरुध्द अपील केले आहे त्याची अधिकृत प्रत.

## नमूना VI
## (नियम २३ पहा)

समक्ष ____________ पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली

किंवा

राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण
(यथास्थिति)

अपील क्र. ________, 200 चे

दरम्यानः

____________

____________ अपीलकार (एक/अनेक)

विरुध्द

____________

____________ प्रतिवादी (एक/अनेक)

### सूचना

कृपया याची नोंद घ्यावी की अपीलदाराने वरील अपील हुकूम / मार्गदर्शन / धोरणात्मक निर्णय (तपशिल द्यावा) च्या विरुध्द दाखल केले असून त्याची सुनावणी _______ ला _______ नियोजित केली आहे.

अपीलाचे निवेदनपत्राच्या प्रती व अपीलासोबत जोडलेली इतर कागदपत्रे आपल्या माहितीसाठी सोबत पाठविली आहेत.

कृपया याची नोंद घ्यावी की अपीलाच्या सुनावणीच्या तारखेस किंवा तद्नंतरच्या तारखेस प्रतिवादी हजर न राहिलेस, अपील एकतर्फी निर्णित केले जाईल.

अपीलकाराच्या वतीने स्वाक्षरी करणारा अधिकृत अधिकारी (मोहोर)

दिनांक :

ठिकाण :



## नमूना VII
## सूचनेचा नमूना
## (नियम 24(1) पहा)
## पंजीकृत टपालाने / परत पावती टपालाने

कडून,

श्री ____________

____________

____________

प्रति,

____________

____________

____________

विषयः जैविक विविधता कायदा, २००२ च्या कलम ६१ (ब) खाली सूचना

ज्याअर्थी ________________________________

च्याकडून जैविक विविधता कायदा, २००२ च्या खाली गुन्हा घडला आहे / घडत आहे .

२. मी / आम्ही जैविक विविधता कायदा, २००२ कलम ६१ (ब) खाली ३० दिवसांची सूचना देतो की, __________ च्या विरुध्द जैविक विविधता कायदा, २००२ च्या तरतूदींचा भंग केल्याबद्दल न्यायालयात तक्रार दाखल करणेचा माझा /आमचा हेतू आहे .

३. माझ्या / आमच्या सूचनेच्या आधारासठी मी / आम्ही पुराव्याचे कागदपत्र सोबत पाठवित आहे / आहोत.

ठिकाणः

दिनांकः

सही

खुलासा :

(१) जर कंपनीच्या नावाने सूचना देणेची असेल तर सूचनेवर कंपनीच्या वतीने सही करण्याचा अधिकार त्या व्यक्तीस दिलेल्या पुराव्याचे दस्तऐवज सूचनेसोबत जोडणेचे आहेत.

(२) आरोपित गुन्हेगाराचे नाव व पत्ता द्यावा. जर जैविक संसाधन / ज्ञान / संशोधन / जैव सर्वेक्षण व जैव उपयोग / बौध्दिक मालमत्ता हक्क / पेटंट चा वापर प्राधिकरणाच्या संमतिवाचून केला असेल व जर काही वाणिज्य उपयोग असेल तर त्या बद्दलचा तपशिल पुरवावा.

(३) आरोपीने केलेला भंग / गुन्हा याची चौकशी करणे शक्य व्हावे म्हणून पुराव्याचे दस्तऐवजामध्ये छायाचित्र, तांत्रिक अहवाल इत्यादि समाविष्ट आहे.

[ फा.क्र. जे-22018/46/2003-CSC(BC) ]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव



## पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली मार्फत लागू केलेली अधिसूचना

S.O.**1146** (E) - जैविक विविधता कायदा, 2002 (2003 चे 18) चे कलम १ पोटकलम (3) प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार केंद्र सरकार 1 आक्टोबर 2003 हा दिवस निश्चित करीत आहे जेव्हा या कायद्यातील खालील कलमे अंमलात येतील, 1 आक्टोबर 2003 पासून - जैविक विविधता कायद्यातील अनुक्रमे कलम 1 व 2; कलम 8 ते 17 (दोहोंसह); कलमे 48, 54, 59, 62, 63, 64 व 65 अंमलात येतील.

[फा.क्र.जे-22018/46/2003-CSC (BC)]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव

G.S.R.**779**(E) - जैविक विविधता कायदा, 2002 (2003 चे 18) कलम 62 मधील पोटकलम (2) उपकलम (अ), पोटकलम (1) बरोबर वाचले असता प्राप्त अधिकारानुसार केंद्र सरकार खालील नियम करीत आहे; वस्तुतः , अध्यक्ष व इतर सदस्यांचे पगार, भत्ते व सेवेच्या अटी, नियम 2003, हे 1 आक्टोबर 2003 पासून अंमलात येतील.

[फा.क्र.जे-22018/46/2003-CSC (BC)]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव

S.O.**1147**(E) - जैविक विविधता कायदा, 2002 (2003 चे 18) कलम ८ पोटकलम (1) व (4) प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार केंद्र सरकार एका मंडळाची स्थापना, राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण या नावाने 1 आक्टोबर 2003 रोजी, व पासून, या कायद्याचे हेतूसाठी करीत आहे ज्यामध्ये खालील सदस्य असतीलः कलम 8 पोटकलम (4) उपकलम (अ) खाली अध्यक्ष म्हणून नेमणूक केलेला सदस्य, 1 आक्टोबर 2003 पासून कार्यान्वित.

[फा.क्र.जे-22018/46/2003-CSC (BC)]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव

S.O.**497** (E) - जैविक विविधता कायदा, 2002 (2003 चे 18) कलम 8 पोटकलम (1) व (4) व राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण (अध्यक्ष व इतर सदस्यांचे पगार, भत्ते व सेवेच्या अटी ) नियम 2003 चा नियम 5 पोटनियम (1) सह वाचले असता, प्राप्त अधिकारानुसार केंद्र सरकार राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरणावर खालील बिन-सरकारी सदस्यांची नेमणूक करीत आहे आणि त्यासाठी अधिसूचना क्र.S.O.1147(E) दि. 1 आक्टोबर 2003 मध्ये दुरुस्ती करीत आहे, जी 15 एप्रिल 2004 रोजी, व पासून, म्हणजे अधिकृत राजपत्रात अधिसूचना जाहीर केलेपासून, अंमलात येईल.

[फ़ा.क्र.जे-22018/46/2003-CSC (BC)]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव

G.S.R.**261**(E) - जैविक विविधता कायदा, 2002 चे कलम 62 प्रमाणे आणि राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण (अध्यक्ष व इतर सदस्यांचे पगार, भत्ते व सेवेच्या अटी ) नियम 2003, रद्दबातल करुन, अर्थात् या रद्दबातल करणेच्या आधी ज्या गोष्टी केल्या आहेत किंवा करणेच्या वगळल्या आहेत त्यांचा मान ठेवून त्या वगळून, केंद्र सरकार खालील नियम करीत आहे व ते 15 एप्रिल 2004 पासून अंमलात येतील.

[फ़ा.क्र.जे-22018/57/2003-CSC (BC)]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव

S.O.**753**(E) - जैविक विविधता कायदा, 2002 (2003 चे 18) कलम 1 पोटकलम (3) प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार केंद्र सरकार 1 जुलै 2004 हा दिवस, या कायद्याची खालील कलमे अंमलात येणेचा दिवस म्हणून निश्चित करीत आहे, 1 जुलै 2004 पासून अंमलातः कलम 3 ते 7 (दोहोंसह); कलम 18 ते ४७ (दोहोंसह); कलम 49 ते 53 (दोहोंसह); कलम 55 ते 58 (दोहोंसह); आणि कलम 60 व 61.

[फ़ा.क्र.जे-22018/46/2003-CSC (BC)]
देश दीपक वर्मा, संयुक्त सचिव

## ABOUT NATIONAL BIODIVERSITY AUTHORITY

Biodiversity is a multi-disciplinary subject involving diverse activities and action. It encompasses the variety of all life on earth. With only 2.5 per cent of land area, India already accounts for 7.8 percent of global recorded species. Over 46000 species of plants and 81,000 species of animals have been recorded in the country so far by the Botanical Survey of India, and the Zoological Survey of India, respectively. India is an acknowledged center of crop diversity, and harbours many wild relatives and breeds of domesticated animals. India is also rich in traditional knowledge, both coded and informal. The stakeholders in biological diversity include the Central Government, State Governments, institutions of local self-governmental organizations, industry, etc. One of the major challenges before India lies in adopting an instrument, which helps realize the objectives of equitable sharing of benefits enshrined in the Convention of Biological Diversity.

India is party to the Convention of Biological Diversity (1992). The Government of India established The National Biodiversity Authority (NBA) in 2003 at Chennai in accordance with Biological Diversity Act, 2002, with the following objectives:

i. To regulate access to biological resources, of the country with the purpose of securing equitable share in benefits arising out of the use of biological resources, and associated knowledge relating to biological resources.
ii. To conserve and sustain able use of biological diversity.
iii. To respect and protect knowledge of local communities related to biodiversity.
iv. To secure sharing of benefits with local people as conservers of biological resources and holders of knowledge and information relating to the use of biological resources.
v. Conservation and development of areas of importance from the standpoint of biological diversity declaring them as biological diversity heritage site.
vi. Protection and rehabilitation of threatened species and
vii. Involvement of institutions of State Governments in the broad scheme of the implementation of the Biological Diversity Act through constitution of committees.